

ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची


फेब्रुवारी २०१३ • मूल्य १० रु.

**द अक्युज्ड**

अपर्णा पाटील

**बलात्कार, जनक्षोभ आणि उपाय**

ॲड. नीलिमा कानेटकर



**स्वामी विवेकानंद**

शिरीष वीरकर

**कभी तनहाईयोंमे यूं...**

राजेश जगताप



'बाईच्या कविता'च्या दुसऱ्या आवृत्तीचे ख्यातनाम गायिका मुबारक बेगम यांच्या हस्ते प्रकाशन!
सोबत अरुण जोशी, कवी किरण येले, सुदेश हिंगलासपूरकर, मनोज आचार्य, राजेश जगताप आणि तबलावादक पंकज धोपावकर

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व ग्रंथाली यांच्या संयुक्त विद्यमाने














# ग्रंथप्रदर्शन क्षणचित्रे











**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# रुची

**फेब्रुवारी २०१३, वर्ष ३१ वे**
**अंक दुसरा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६
☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthaliruchee@gmail.com
granthali02@gmail.com
www.granthali.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

ईश्वरेच्छा बलियसी! दुसरे काय? यावर्षी पाण्याचे दुर्भिक्ष्य असेल आणि त्यामुळे काही कठोर निर्णय घ्यावे लागतील असे मुख्यमंत्री म्हणाले ते उगाच नाही. आषाढीला विठ्ठलचरणी साकडे घालूनही पाऊस पडला नाही तर सरकार काय करणार? जीवन–मरणाची दोरी 'त्या'च्या हातात असताना, शेतकरी आत्महत्या करतात त्यासाठी सरकारला जबाबदार धरून कसे चालेल? कुठे नद्यांमुळे महापूर येतात, कुठे इंद्रायणीची 'काठी' दिसते, पाऊस पाडण्यात 'त्या'च्या ह्या पक्षपातीपणाला सरकार दोषी कसे? धान्य सडले तरी भुकेल्यांना न देण्यामागे सरकारच्या काही अडचणी असतात हे आपल्या लक्षात येत नाही. धान्यापासून दारू बनवायच्या योजनेवर किंवा दारिद्र्यरेषेची जाडी ७० टक्क्यांना सामावून घेण्याइतकी मोठी करण्याच्या विचारावर टीका होते, मग सरकारने करायचे काय? भरसभेत वस्त्राला हात घातलेल्या द्रौपदीच्या रक्षणासाठी कृष्ण धावला तेव्हा इतर नरवीर बघ्याचीच भूमिका घेत होते, तशीच घटना दिल्लीसारख्या विविध ठिकाणी घडताना, जाती–अस्मितेच्या नावाने छाती फुगवणारे, रक्त सांडणारे नरवीर बघ्याची भूमिका घेतात त्याच्याशी सरकारचा संबंध काय? कायदा आणि सुरक्षाही 'त्या'च्याच हाती असते. शंभर अपराध भरल्याशिवाय 'तो'ही शासन करत नाही आणि अखेर खरा न्याय 'त्या'च्या दरबारात मिळतो, मग सरकारने सुरक्षेची आणि न्यायलयांनी न्यायाची तत्परता दाखवावी कशाला?

देव आणि मायबाप सरकार यांच्यातल्या या लपंडावात आपण का भरडावे, हाही एक प्रश्नच आहे.

या अंकात मुबारक बेगम या अस्सल गायिकेची सद्यस्थिती, कुमार नवाथेंची विविध क्षेत्रातली मुक्त मुशाफिरी, एका व्यंगचित्रकाराची ओळख असे लेख आहेत. ॲड. नीलिमा कानेटकर आणि अपर्णा पाटील बलात्कार घटनेवर भावना मांडतात. या व्यक्तींचे जगणे समाजातून समाजासाठी आहे, कारण यातला कोणीच सरकारात नाही!

**– कार्यकारी संपादक**

अमृतमहोत्सवानिमित्त

**डॉ. प्रेमानंद रामाणी**

यांचा सत्कार

**भारत वीर वांच्छू**

राज्यपाल, गोवा

यांच्या हस्ते होत आहे.

गोव्याला मडगाव येथील रवींद्रभवनमध्ये

रविवार, १७ फेब्रुवारी २०१३ रोजी

सायंकाळी ५ वाजता होणाऱ्या

या सत्कार समारंभास

गोव्याचे मुख्यमंत्री **मनोहर पर्रीकर**

यांची प्रमुख उपस्थिती असेल.

डॉ. पी.एस. रामाणी लिखित

**'जीवन आणि स्वास्थ्य'** या पुस्तकाची

दुसरी सुधारित आवृत्ती

आणि


त्याचे इंग्रजी रूपांतर

Life and Health

या दोन पुस्तकांचे प्रकाशनही यावेळी होणार आहे.

---


## डॉ. पी.एस. रामाणी यांची दोन ताजी पुस्तके




**जीवन आणि स्वास्थ्य**

(दुसरी आवृत्ती)

**Life and Health**




**मूल्य प्रत्येकी १२० रु.**

**सवलतीत प्रत्येकी ७० रु.**

# कभी तनहाईयों में...

**राजेश जगताप**



एकेकाळच्या प्रसिद्ध गायिका मुबारक बेगम आज विस्मरणात गेल्या असल्या तरी त्यांनी गायलेली गाणी आजही रसिकांच्या स्मरणात आहेत. प्रत्येकाचा एक काळ असतो, प्रत्येकाची एक वेळ असते, अशी काहीशी परिस्थिती मुबारक बेगम यांची झाली आहे. आज त्या एवढ्या बिकट परिस्थितीत आपलं उर्वरित आयुष्य घालवत असतील असं मात्र वाटलं नव्हतं. मुबारक बेगम यांना प्रत्यक्ष भेटण्याचा योग आल्यानं त्यांची परिस्थिती जवळून पाहायला मिळाली आणि मोठा धक्का बसला.

अंबरनाथमध्ये एका पडीक जागेचं रूपांतर मनमोहक अशा संगीत पार्कमध्ये करण्यात आलं आहे. खरं तर ही जागा कुणाच्या लक्षात येणार नाही अशीच होती. मात्र नगराध्यक्ष सुनील चौधरी यांच्या संकल्पनेतून आणि 'क' या संस्थेच्या सहकार्यामुळे हे सर्व शक्य झालं. 'क'चे कवी किरण येले, उमेश नाडकर, नितीन माने अशा आमच्या टीमनं बरीच मेहनत हे पार्क तयार करण्यासाठी घेतली आहे. या पार्कमध्ये विविध प्रकारचं संगीत ऐकण्यासाठी ठरावीक अंतरावर, सहज दिसणार नाहीत असे स्पीकर लावले आहेत. सतार, तबला, हार्मोनियम अशा काही वाद्यांच्या प्रतिकृतीही तयार करून या पार्कमध्ये लावण्यात आल्या आहेत. शहर व परिसरातील संगीत, साहित्य व कला क्षेत्रातील कलाकारांना आपली कला सादर करण्यासाठी हक्काचं स्थान म्हणून या ठिकाणी एक छोटेखानी मंचही तयार करण्यात आला आहे. साधारण अडीचशे लोकांची बैठकव्यवस्था होईल अशी सोय या ठिकाणी आहे. कलाकारांना आपल्या चित्रांचं किंवा इतर कलेचं प्रदर्शन भरवण्यासाठी कलादालनही साकारलं आहे. त्यामुळे ठरवलं तर एका पडीक जागेचा सदुपयोग कसा होऊ शकतो याचं सुंदर उदाहरणच या पार्कमुळे पाहायला मिळतं.

'आनंदघन संगीत पार्क व कलादालन' असं नाव या पार्कला देण्यात आलं आहे. या पार्कच्या उद्घाटनाचा विषय पुढे आला तेव्हा चर्चेतनं अवधूत गुप्ते, सलील कुलकर्णी अशा नवीन संगीतकार व गायकांपैकी कुणाला उद्घाटनासाठी आणायचं का, असा विषय पुढे आला. तेव्हा कवी किरण येले यांनी जुन्या गायिका मुबारक बेगम यांचं नाव सुचवलं आणि एकमतानं मुबारक बेगम यांच्या नावावर आम्ही शिक्कामोर्तब केलं. मुबारक बेगम यांचं नाव पक्कं झाल्यानं त्यांची भेट घेण्याचं ठरवलं. माझ्या सोबत माझे मित्र उमेश नाडकर आणि नितीन माने असे आम्ही तिघं मुबारक बेगम राहत असलेल्या जोगेश्वरीला निघालो. एका प्रसिद्ध गायिकेला भेटायला जात असल्यानं डोळ्यांसमोर एक आलिशान बंगला होता. बंगल्यासमोरील लॉनवर मुबारक बेगम बसल्या असतील. दारासमोर गाडी असेल, त्यांच्या खातिरदारीसाठी नोकरांचा गराडा असेल. पेडररोड परिसरात राहत असलेल्या इतर कलाकारांप्रमाणे त्याही अगदी ऐशआरामात आपलं आयुष्य घालवत असतील असंच चित्र मनात झालं होतं. जोगेश्वरीतील अरुंद रस्ते संपून मोठे रस्ते येतील व समोर बेगम यांचा बंगला दिसेल असा विचार मनात करत असताना आमची गाडी अरुंद रस्ते आणि इराणी हॉटेल्स पार करत

एका वसाहतीजवळ येऊन थांबली. तिथे काही लोकांना विचारलं, मुबारक बेगमसाहिबा कहाँ रहती है, तेव्हा कुणालाच त्या माहीत नसल्याचं जाणवलं! अखेर एका जुन्या टिपिकल इमारतीखाली आम्ही उभे असताना एका पानवाल्याला विचारलं तेव्हा 'मुबारक बेगम! कभी तनहाईयोंमे हमारी याद आयेगी गानेवाली ना? वो सामनेवाली बिल्डिंगमे रहती है' असं म्हणून त्यानं दाखवलेल्या इमारतीकडे पाहून आमच्या सगळ्यांच्याच चेहऱ्याचे भाव बदलले. मुबारक बेगम त्याच इमारतीत राहत होत्या. त्यांच्या बिल्डिंगमध्ये शिरल्यानंतर त्या डॉक्टरकडे गेल्या असल्याचं कळलं. आम्ही खालीच त्या येण्याची वाट पाहत होतो. काही वेळातच त्या एका भाड्याच्या टॅक्सीमधून उतरल्या. आम्ही त्यांच्या गाडीजवळ गेलो तेव्हा आमचे नवीन चेहरे पाहून 'आप आये हो क्या?' असा सवाल करत आम्हाला अगदी अदबीनं घरी येण्यास सांगितलं. एकेकाळची गाजलेली गायिका म्हणून मनात त्यांची एक वेगळी प्रतिमा तयार झाली होती. मात्र त्यांची परिस्थिती व त्या राहत असलेली इमारत पाहून मन सुन्न झालं.

आजारपण आणि पाठीच्या दुखण्यानं मुबारक बेगम यांना चालणंही कठीण झालं होतं. एक एक पाऊल टाकत त्या इमारतीच्या पायऱ्या चढत होत्या. त्यांच्या मागून आम्हाही घरात प्रवेश केला तेव्हा मात्र मन अधिकच निराश झालं. घरात प्रवेश करताच, हॉलचं रूपांतर बेडरूममध्ये केल्याचं दिसलं. घराच्या भिंतींना पोपडे आलेले. त्या भिंतींवर स्टुडिओतील मुबारक बेगम यांचे सुंदर फोटो लावलेले. कमी जागेत सामान कोंबावं तशी ती खोली होती. मुबारक बेगम पलंगावर जाऊन बसल्या त्या पलंगाखाली पन्नाशी ओलांडलेली एक स्त्री अंथरुणावर झोपलेली दिसली. ती स्त्री मुबारक बेगम यांची मुलगी असल्याचं कळलं, गेली कित्येक वर्षं ती पार्किन्सन आजारामुळे अंथरुणावरच आहे. तिनंही आम्हाला हात जोडून नमस्कार केला. मुबारक बेगम यांची अशी परिस्थिती पाहून




मनात विचारांचं काहूर माजत असताना, 'बताईये क्या प्रोग्राम है' असं म्हणत त्यांनी सरळ विषयाला हात घातला. आमच्याशी बोलताना 'पानी-चाय लेंगेना आप, आनेमे तकलीफ तो नही हुई' अशी आमची घरातल्या वडीलधाऱ्यांप्रमाणे विचारपूसही करत होत्या. यावेळी त्यांच्या वागण्यातून त्यांच्या मोठ्या मनाचा अनुभव आम्हाला आला.

सरकारी कोट्यातून मुबारक बेगम यांना ते घर मिळालं होतं. हॉल, बेडरूम आणि किचन एवढंच हे घर होतं. शासनाचं आजवर सातशे रुपयांचं पेन्शन आता चौदाशे रुपये झालं असल्याचं त्या सांगतात. मात्र इमारतीचा मेन्टेनन्स द्यावा लागतो तो एकवीसशे रुपये. ही एक मोठी थट्टाच सरकारकडून होत असल्याचं त्या सांगत होत्या. आपली परिस्थिती गंभीर आहे, सरकार आमच्या-सारख्यांसाठी काहीच करत नाही असंही त्या सांगत होत्या. आपल्या जुन्या आठवणी सांगताना स्टुडिओमधले काही फोटोही त्यांनी दाखवले. फोटोतले गायक आम्हाला ओळखण्यासाठी सांगून 'ये रफी साहब, ये सुमन कल्याणपूर' असं सांगत त्या जुन्या स्मृतींमध्ये हरवताना दिसत होत्या. प्रोग्राममे मै जरूर गाऊंगी असं सांगत त्यांनी *'कभी तनहाईयों मे यूं हमारी याद आयेगी'*... हे गाणं गाऊन दाखवत त्या काळातील आठवणी जागवल्या. आमच्या गप्पा रंगल्या होत्या. खरं तर त्यांनाही आमच्यासोबत बोलत राहावं असंच वाटत होतं. मात्र संध्याकाळचा वेळ बराच झाला होता आणि आम्हालाही पुन्हा घराकडे वळायचं होतं. तेव्हा मुबारक बेगम पलंगावरून आमचा हात धरत खाली उतरल्या. 'मै वक्तपर आ जाऊंगी' असं म्हणत त्यांनी आपल्या नातीला हाक मारली आणि फिल्म्स डिव्हिजननं त्यांच्यावर तयार केलेल्या एका शॉर्ट फिल्मची सीडी आम्हाला देण्यास सांगितली. 'प्रोग्राममे ये सीडी जरूर दिखाना' असं त्यांनी आवर्जून सांगितलं. त्यांची सगळी परिस्थिती डोळ्यांसमोरून हटत नसल्यानं शून्य मनानं आम्ही त्यांचा निरोप घेतला. परतीचा सुरू झालेल्या प्रवासात त्यांचाच विषय आणि डोळ्यांसमोर येणारा त्यांचा चेहरा होता. हा अंधारलेला रस्ता लवकर संपावा असं वाटत होतं.

संगीत पार्कच्या उद्घाटनाचा तो दिवस अखेर उजाडला. साडेसहा वाजण्याचा कार्यक्रम असताना सहा वाजताच रसिक प्रेक्षकांनी या पार्कमध्ये गर्दी करण्यास सुरुवात केली. बघता बघता अनपेक्षित गर्दी या पार्कमध्ये जमली. मुबारक बेगमही वेळेवर आल्या होत्या. कार्यक्रम सुरू व्हायला काहीसा उशीर झाला होता. त्यामुळे त्या चिडतील का, असं क्षणभर वाटलं. मात्र मुबारक बेगम यांचा उत्साह व चेहऱ्यावरचं त्यांचं तेज कायम होतं. मुबारक बेगम यांची मुलाखत प्रसिद्ध चित्रकार, संपादक व संगीतदर्दी मनोज आचार्य घेणार होते तर

‘हमराही’ – मुबारक बेगम
संगीतकार जयकिशन
व महमंद रफी यांच्यासह
आणि
उजवीकडे अंबरनाथच्या कार्यक्रमात गाताना





मुबारक बेगम यांनी गायलेली गाणी प्रा. मानसी नाडकर गाणार होत्या. प्रत्यक्ष मुबारक बेगम यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम सुरू झाला. त्यांनी सूर लावताच उपस्थित प्रेक्षक व मान्यवरांनी उभं राहून टाळ्यांच्या गजरात त्यांचं स्वागत केलं.

त्या मूळ राजस्थानच्या. ‘मुझे बचपनसेही गाने का बहोत शोक था. मेरे दादाजी जब फिल्म देखने जाते तो मै भी साथमें ले जाने को बोलती. मगर जैसेही टॉकिज में अंधेरा होता तो मै सो जाती थी. फिर दुसरे दिन दादाजी को सिनेमा ले जाने कहती, मगर दादाजी कहते, तुम सो जाती हो. उस वक्त, अब मै नही सोउंगी कहकर फिर दुसरे दिन फिल्म देखने जाती’ अशी बालपणीची आठवण सांगत त्या म्हणाल्या, की उलट, सुरय्यांची गाणी आपण लिहून आणली होती, ‘सुरय्या के गाने देखके ही मै गाने लगी.’ मुबारक बेगम यांना असलेली गाण्यांची आवड पाहून त्यांच्या वडिलांनी त्यांना मुंबईला आणलं. दोन वर्षं त्यांनी रियादखान आणि शमदखान यांच्याकडे गाणं शिकल्यानंतर सुरुवातीला त्या ऑल इंडिया रेडिओवर गाऊ लागल्या. सिनेमामध्ये गायला मिळावं म्हणून त्यांचे वडील त्यांना घेऊन स्टुडिओमध्ये जाऊन भेटायचे तेव्हा ‘पता दे जाओ’ असंच सर्व म्हणायचे, असं सांगून सुरुवातीला गाणं मिळवण्यासाठी मोठी कसरत करावी लागल्याचं त्यांनी सांगितलं. त्यानंतर आगाजानी काश्मिरी यांनी त्यांना सर्वप्रथम गायला बोलावलं. दोन गाणी त्यांना गायची होती. मात्र स्टुडिओमधील गर्दी पाहून आपण घाबरलो व गाणं गाऊ शकलो नाही अशी प्रांजळ कबुलीही त्यांनी यावेळी दिली. पुढे त्यांना धरमपत्नी या सिनेमात गाण्याची संधी मिळाली. या सिनेमात त्यांनी चक्क आठ गाणी गायली. धरमपत्नी सिनेमातील ‘देवता तुम हो मेरा सहारा, मैने थामा है दामन तुम्हारा...’, ‘थामलो अपनी राधा को भगवन, तुटना जाये दिल की धडकन...’ अशी काही गाणीही त्यांनी यावेळी गाऊन दाखवली. आज वयाच्या ७२व्या वर्षी, आजारपण विसरून त्यांनी पुन्हा सूर लावला होता. तेव्हा भल्याभल्यांनाही लाजवेल अशा आवाजाची झलक अंबरनाथच्या रसिकांना ऐकायला मिळाली. ज्यावेळेस एस.डी. बर्मन यांच्यासमोर प्रथमच गाणं गाऊन दाखवण्याची वेळ आली तेव्हा त्यांनी, ‘आवाज को पॉलिश करो’ असा सल्ला दिला होता. मात्र याच बर्मनसाहेबांनी पुढे ‘तुम्हारा गाना बहोत अच्छा हुआ’ अशी सांगण्याची वेळ त्यांच्यावर आली. हे केवळ आपल्या मेहनतीनं शक्य झालं असल्याचं त्यांनी बोलून दाखवलं. त्यानंतर मात्र दादही दिली. ‘मुझको अपने गले लगालो..’, ‘कभी तनहाईयों मे यूं हमारी याद आयेगी..’, ‘रहेगा इश्क तेरा मुझे मिलाके तुझे..’ अशी काही अजरामर गाणी त्यांनी गायली. ‘गाने के लिए रिहर्सल हुआ करती थी, मगर मै एक या दो टेकमेही अपना गाना पुरा करती थी. भाटकरसाहब के सामने जब गाना गाया था तो उन्होंने चार आने मुझे दिये थे. वो मैने बहोत दिनों तक संभालकर रखे थे’ अशी आठवण त्यांनी यावेळी सांगितली. तुम्ही वेगवेगळ्या भाषांत गाणी गायली असली तरी मराठीत गाणं गायलं नाही या प्रश्नाला उत्तर देताना, ‘मैंने राजस्थानी, मारवाडी, पंजाबी, सिंधी, ऐसे बहोत भाषामें गाना गाया मगर मराठी गाने का कभी मोका नही मिला. किसीने गवालिया होता तो मराठी भी गा

लेती.' असं सांगताना सामना पेपरमध्ये काही महिन्यांपूर्वी त्यांच्याबाबत छापून आल्याचं समजलं तेव्हा थोडी भीती वाटली होती, पण चांगलं छापलं असल्याचं कळल्यानं हायसं वाटलं असं सांगताना, 'बालासाहब बहुत अच्छे इन्सान थे. उनकी वजहसेही मुंबई के पूल बने. उनके बेटेभी अच्छे है' असं म्हणताच प्रेक्षकांनी टाळ्यांचा गजर केला.

गाण्याच्या क्षेत्रात आपल्यावर अनेकदा अन्यायही झाला. अनेकदा माझ्याकडून गाणं गाऊन घेतलं जायचं मात्र ते गाणं सिनेमात घेतलं जात नव्हतं. 'मैंने गाना गाया तो वो हिट होता था. इस बात की मुझे बहोत तकलीफ भी हुई' असं सांगत, बप्पी लाहरींनी असा अन्याय आपल्यावर केला तेव्हा आपण त्यांना फोन करून चांगलंच सुनावलं होतं, असा किस्साही सांगितला. मात्र निराश न होता, 'जिसे खुदपे भरोसा नही होता वो दुसरे को आगे जाने नही देता' अशी मार्मिक टिप्पणी मोनोपोलीविषयी बोलताना केली. अखेर आपल्याला गाणं बंद करण्याची वेळ आली. अनेकांनी कार्यक्रमात गात राहा असं सांगितलं पण 'अब मै नही गाऊंगी' असा स्पष्ट निर्णय घेऊन संगीतक्षेत्राला सलाम ठोकल्याचंही त्यांनी सांगितलं. बेगम अख्तर यांच्याबाबत सांगताना 'उनके बारे मे मै क्या बताऊ! बहोत अच्छा आवाज था उनका. गझल के लिये तो उनका आवाज बहोतही अच्छा था' अशी बेगम अख्तर यांची तारीफ केली. आजही देश व परदेशात आपले चाहते असल्याचं सांगून तेच महिन्याकाठी मला आर्थिक मदत करत असतात असंही सांगायला त्या विसरल्या नाहीत. आपल्या सोबतच्या आशा भोसले, लता मंगेशकर, गीता दत्त, महंमद रफी, तलत मेहमूद, सुमन कल्याणपूरकर आदींच्या आठवणीही त्यांनी जागवल्या. मनोज आचार्य यांनी खुलावलेली मुलाखत व गाणी अशा सदाबहार कार्यक्रमाच्या शेवटापर्यंत रसिक प्रेक्षक जागचा हलला नाही. कार्यक्रम आटोपल्यानंतर मुबारक बेगमना चाहत्यांनी अक्षरशः गराडा घातला. कुणी त्यांच्या पायाला नमस्कार करत होता तर कुणी ऑटोग्राफसाठी धडपडत होता. अखेर चाहत्यांना सलाम करून मुबारक बेगम गाडीत बसल्या. मुबारकआपा यांची गाडी नजरेआड होईपर्यंत आम्ही सारेच त्या गाडीकडे पाहत होतो. वाटत होतं मुबारक बेगम यांच्याबरोबरचा हा संवाद कधीच संपू नये, त्या आमच्यातून दूर जाऊ नयेत, त्यांचं गाणं कायम आमच्या स्मरणात राहो...

दोन दिवसांनंतर मुबारक बेगम यांचा फोन माझ्या मोबाईलवर आला. क्षणभर विश्वास बसत नव्हता की त्यांचा फोन आलाय. मी अदबीनं त्यांना नमस्कार केला. तेव्हा त्यांनीच 'आप सब कैसे है? प्रोग्राम बहोत अच्छा हुआ. आप लोगोने मेरा बहोत खयाल रखा' असं म्हणून तब्बल वीस मिनिटं त्या माझ्याशी बोलत राहिल्या. खरं तर त्यांचा फोन आल्यानं मला खजिल झाल्यासारखं झालं होतं. त्या पोचल्या का म्हणून आम्हीच त्यांना फोन करायला हवा होता. त्यांची खुशाली विचारायला हवी होती. पण कामाच्या व्यापात आम्ही त्यांना फोन करायला विसरलो होतो. त्यांनी मात्र आठवणीनं आम्हाला फोन केला हे न विसरण्यासारखं आहे. ही गोष्ट आम्ही मनोज आचार्य यांना फोनवर ज्यावेळेस सांगितली तेव्हा ते म्हणाले, खरे कलावंत फार संस्कारीत असतात, म्हणूनच ते ग्रेट असतात..

मुलाखत सुरू करण्याआधी फिल्म डिव्हिजननं तयार केलेली सीडी प्रसारित करून वातावरणनिर्मिती झाली होतीच. त्याचवेळी 'ग्रंथाली' प्रकाशित किरण येले यांच्या 'बाईच्या कविता' या काव्यसंग्रहाच्या द्वितीय आवृत्तीचं प्रकाशन मुबारक बेगम यांच्या हस्ते करण्यात आलं. एवढ्या मोठ्या गायिकेच्या हस्ते हे प्रकाशन होणं म्हणजे माझं भाग्यच असल्याचं किरण येले यांनी बोलून दाखवलं. या सोहळ्यास 'ग्रंथाली'चे अरुण जोशी आणि सुदेश हिंगलासपूरकर आवर्जून उपस्थित होते. प्रकाशन झालं तेव्हा 'किस भाषा मे है?' असं मुबारक बेगम यांनी विचारलं. आपल्याला मराठी यायला हवं होतं असे भाव यांच्या चेहऱ्यावर पाहायला मिळाले.

हा एक अविस्मरणीय अनुभव होता. त्यांच्या गाण्यानं आमचं जीवन संपन्न करणारा, तसाच त्यांच्या आजच्या परिस्थितीनं मन हेलावून टाकणारा.


**– राजेश जगताप**
वडवली विभाग
अंबरनाथ पूर्व

दु
स
री
आवृत्ती

**बाईच्या कविता – किरण येले**

दिलीप कुमारचा 'देवदास'जेव्हा जेव्हा पाहायचो
त्यातला देवदास, चंद्रमुखी नावाच्या वेश्येला
''तुम जैसी औरतें सहनशीलता की मूरत होती है.''
म्हणताना मी हमसून रडायचो का, ते आता कळतंय...

**मूल्य ८० रुपये**
**सवलतीत ५० रुपये**




# एक लोभस व्यक्तिमत्त्व

## अरुण पुराणिक

पुणे हे जसे खडूस, तिरकस बोलणाऱ्या लोकांसाठी प्रसिद्ध आहे त्यापेक्षा ते जास्त विद्वान, साहित्यिक, व्यासंगी, कलागुणसंपन्न लोकांसाठी प्रसिद्ध आहे. पंचेचाळीस वर्षांपूर्वी असाच एक; जन्माने पुणेकर असलेला, नारायणपेठेत राहणारा, सुशिक्षित, मध्यमवर्गीय कुटुंबातला, गरीब-सालस तरुण नोकरीधंद्याच्या शोधार्थ मुंबईला आला आणि कायमचा मुंबईकर झाला. मुंबईच्या मोहजालात गुरफटला तरी त्याची पुण्याची नाळ कधी तुटली नाही. पुण्याची ओढ त्याला कामाच्या व्यापातही कधी स्वस्थ बसू देत नाही, वेळ मिळेल तेव्हा तो पुण्याला पळतो. त्यामुळे आमच्या या मित्रामध्ये, कुमार नवाथे याच्यामध्ये, मुंबई आणि पुणे या दोन्ही संस्कृतींचे विलोभनीय प्रतिबिंब दिसते.

लोक पहिल्या भेटीतच कुमारच्या प्रेमात पडतात आणि त्याच्याशी एकनिष्ठ राहतात. कधी कधी मनात शंका येते, याला वशीकरणाची कला तर साध्य झाली नसावी ना? कारण तो जसजसा उमजू लागतो तसतसा तो अधिकच आवडू लागतो.

'कुमार' तारुण्याने रसरसलेली उत्साहमूर्ती, एक लोभसवाणे व्यक्तिमत्त्व. (मी देव आनंद आणि कुमार नवाथे या दोन व्यक्तींना कधीही गबाळ्या अवतारात पाहिलेले नाही.) आपण रविवारी उठून ठाणे-बोरीवलीला जावे तसा सर्व जगात संचार करणारा भटक्या, लंडनच्या पबमध्ये बसून थंडगार बिअरचा आस्वाद घेणारा दर्दी, मद्याच्या कलात्मक मिनिएचर बाटल्या जमवणारा संग्राहक, 'अतिथी देवो भव' म्हणून



घरी येणाऱ्या पाहुण्यांची उत्तम बडदास्त ठेवणारा यजमान, उत्तम दर्जेदार साहित्य, कला आणि संगीताचा आस्वाद घेणारा रसिक! पॉलिशड् भाषा, सभ्य-सुसंस्कृत वर्तन! सर्वसाधारण पुरुषांना प्रिय असणारे चावट, सवंग विनोद कुमारला कधीच रुचले नाहीत, मात्र त्याची विनोदबुद्धी तल्लख! स्वत:च्या फजितीचेही रसभरीत वर्णन करत तो मित्रांना हसवणार! कुमारच्या सहवासात त्याचे असे अनेक पैलू आपल्याला पाहायला मिळतात.

कुमार आठवीत शिकत असतानाच वडिलांचे छत्र हरपले. घरात पाच भाऊ आणि एक बहीण. त्यांच्या सर्वात मोठ्या भावाने- नानाने - कुटुंबाची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली. कुमारने आपला पहिला ग्रंथ 'नाझी नरसंहार' हा या नानांनाच मोठ्या कृतज्ञतेनं अर्पण केला आहे. मोठा भाऊ मुकुंद वयाच्या एकोणिसाव्या वर्षी नशीब अजमावण्यासाठी लंडनला गेला व तिथेच स्थायिक झाला. सध्या त्याचे दोन भाऊ लंडनला, तर इतर दोन भाऊ पुण्याला असतात.

घरच्या हलाखीच्या प्रसंगाला तोंड देण्यासाठी, नोकरीधंद्याच्या शोधार्थ कुमार १९६७च्या दरम्यान पुण्याला रामराम ठोकून मुंबईला आला. कसलीही ओळखपाळख नसताना श्रीधर भालचंद्र कंपनीच्या मधुभाई लघाटे यांनी नवीन धंदा चालू करण्यासाठी कुमारला आर्थिक भांडवल दिले. लोकांना याचे आश्चर्य वाटले. तेव्हा मधुभाई म्हणाले, मी माणसाचा चेहरा पाहून त्याला पैसे देतो. हा सज्जन माणूस माझे पैसे कधीच बुडवणार नाही आणि अगदी तसेच घडले. कुमारनेच 'कालनिर्णय'च्या दिवाळी अंकात प्रांजळपणे ही सत्यकथा लिहिली आहे.

सुरुवातीच्या काळात कुमार पार्ल्याला गानूंच्या बंगल्यात भाड्याने राहत होता. माधवराव गडकरी हे त्या काळातले कुमारचे दैवत. माधवरावांनी, उतारवयात उपेक्षेचे जिणे जगणाऱ्या सिनेकलावंताच्या दु:खाला 'लोकसत्ता'तून वाचा फोडली. त्यासाठी निधीही जमवला. कुमारचा या उपक्रमात मोठा सहभाग होता. त्याने या वृद्ध कलावंतांच्या घरी जाऊन त्यांना मदतीचा हात दिला.

गडकरींमुळेच कुमार जागतिक मराठी परिषदेचा सक्रिय सभासद बनला. गडकरी 'शेजार' ही दूरदर्शन मालिका करत होते. त्यासाठी पोर्तुगालमध्ये जाऊन चित्रीकरण करणे गरजेचे होते. दूरदर्शन ही एकमेव सरकारी वाहिनी त्यावेळी कार्यरत होती आणि तिला हा खर्च झेपण्यासारखा नव्हता. या

कठीणसमयी कुमार पुढे झाला. त्याने या सर्व युनिटला घेऊन पोर्तुगालमधील लिस्बनला चित्रीकरण केले. याचे तेरा एपिसोड झाले. आनंद अभ्यंकर, मकरंद अनासपुरे आदींनी त्यात भूमिका केल्या होत्या. हे पुढे लोकप्रिय अभिनेते झाले.

आराधना ट्रॅव्हल्सचे शरद किराणे हे कुमारचे मावसभाऊ! शरद आणि संगीतप्रेमी बाळ सप्रे हे कुमारचे गेल्या चाळीस वर्षांपासूनचे दोस्त. किराण्यांची वर्षासहल आणि बाळ सप्रेंची सांगीतिक मैफल कुमारने सहसा चुकवली नाही.

धंद्यात सचोटी आणि त्याला कष्टांची जोड, यामुळे कुमारने धंद्यात चांगला जम बसवून तो भरभराटीला आणला. पार्ल्यात स्वत:चा मोठा फ्लॅट घेतला. ११ डिसेंबर १९७० रोजी कुमारचा रेखाबरोबर विवाह झाला. कुमारची सासुरवाडी कुरे ही २१, बांद्रा कलानगरची! समोरच बाळासाहेब ठाकरे यांचा बंगला. शिवसेनेची नुकतीच स्थापना झाली होती. त्याकाळी कलानगरमध्ये विशेष वर्दळ नसल्यामुळे कुमारची बाळासाहेबांबरोबर भेट होत असे. बाळासाहेब कौतुकाने कुमारला कलानगरचे जावई म्हणत. कुमारच्या लेकीचा अपर्णाचा (सोनल) जन्म कलानगरमध्येच झाला. तिला पाळण्यात घालून अपर्णा या नावाने तिचे बारसे मीनाताई ठाकरे यांनीच केले होते. अपर्णाची सासुरवाडीही कलानगरमध्येच बाळासाहेबांच्या शेजारच्या बंगल्यात आहे.

१९८९-९० मध्ये कुमारच्या घरी पार्टी होती. यासाठी कुमारने माधवराव गडकरींबरोबर मंगेश पाडगावकरांनाही निमंत्रित केले होते. पाडगावकर घरी आल्यावर कुमारने मोठ्या भक्तिभावाने त्यांना आपला पुस्तकसंग्रह दाखवला. पाडगावकरांच्या पुस्तकांवर त्यांच्या सह्या घेतल्या. तेव्हा पाडगावकर मिस्किलपणे माधवरावांना म्हणाले, 'हे कुमार माझ्या कविता नुसत्या वाचत नाहीत तर ते कविता पितात.' कालांतराने हे स्नेहसंबंध अधिकच दृढ झाले. पाडगावकरांचा कार्यक्रम देशात-परदेशात कुठेही असो, कुमारची उपस्थिती ठरलेली आहे.

पार्ल्याच्या गोमंतक हॉलमध्ये कुमार केतकरांचा सत्कार समारंभ होता. डॉ. सुभाष भेंडे त्यासाठी कुमार नवाथेला बरोबर घेऊन गेले होते. राजकारण, समाजकारणावरची दोन्ही कुमारांची मते तशी परस्परविरोधी होती, पण दोघांची पुस्तक वाचनाची आवड मात्र सारखी होती. या पुस्तकांच्या देवाणघेवाणीमुळेच दोघांची घनिष्ट मैत्री झाली आणि ती आजही कायम आहे. कुमारच्या 'नाझी नरसंहार' या पुस्तकाचे प्रकाशनही कुमार केतकरांच्या हस्तेच झाले. खरे तर केतकरांनीच कुमारला लिहिते केले. मंगेश पाडगावकरांवर कुमार ज्या उत्कटतेने बोलत होता ते ऐकून तो लेख तूच लिही असा आग्रह केतकरांनी धरला. कुमार याचा कृतज्ञतेने उल्लेख करतो.


अरुण साधूंसोबत कुमारची दिनकर गांगलांशी भेट झाली आणि 'ग्रंथाली'शी त्याचे स्नेहसंबंध जुळले. कुमार नुकताच पोलंडला जाऊन आला होता. तेथील अनुभवांविषयी भावुकतेने भरभरून बोलत होते. त्याचवेळी गांगलांनी ठरवले, हा इतिहास वाचकांसमोर यायलाच हवा आणि त्यांनी कुमारला प्रोत्साहन देऊन या विषयावर पुस्तक लिहिण्यास प्रवृत्त केले. तिथेच अरुण जोशी, सुदेश हिंगलासपूरकर हे कुमारचे दोस्त झाले. आज कुमारच्या या पुस्तकाच्या तीन आवृत्त्या झाल्या आहेत. दोन भाषांत भाषांतरे झाली आहेत, दूरदर्शनवर यावर चर्चाही झाली आहे.

विख्यात चित्रकार सुहास बहुलकर हे तर कुमारचे पार्ल्यातील शेजारीच! रामदास फुटाणे कुमारचे जुने मित्र. पुण्यातील आपला जुना राहता वाडा कुमारने रामदास फुटाणेंनाच विकला आहे. जागतिक मराठी परिषदेमुळे कुमारचा मित्रपरिवार अधिकच विस्तारला. मोहन गोरे, प्रदीप भिडे तिथेच भेटले. डॉ. वि.ना. श्रीखंडे, वसंत सरवटे, नारायण सुर्वे, मोहनदास सुखटणकर, यशवंत देव, रवींद्र साठे, जवाहर बुक डेपोचे दिलीप भोगले, पॉप्युलरचे रामदास भटकळ, सुभाष कर्नाटकी, डॉ. अरुण टिकेकर, कवी सुधीर मोघे, प्रा. चितळे, प्रकाशक अरुण जाखडे, अरुण शेवते, शिवाजीराव अढळराव पाटील, मोहनराव देशमुख आदी मित्रमंडळींबरोबर नियमितपणे गप्पांचे फड रंगू लागले. कुमारची सर्वात जुनी आणि जवळची मैत्रीण एकच ती म्हणजे माया परांजपे. ती कुमारची नुसती मैत्रीणच नाही तर सल्लागारही आहे.

आपल्या मित्रमंडळींना घरी बोलावून खाऊपिऊ घालणे, मनसोक्त गप्पा मारणे- कुमारच्या भाषेत फड रंगवणे - हा कुमारचा आवडता छंद. रात्री घरच्या मंडळींना त्रास नको म्हणून कुमारने त्याच्याच सोसायटीमध्ये



**वॉर्सामधील घेट्टोच्या भिंतीशेजारी नव्वदीच्या ज्यू व्यक्तीकडून कहाणी ऐकताना कुमार नवाथे**



**अमीन सयानी, विजय किशोर दुबे (सिलोन रेडिओचे पहिले प्रोग्रॅम डायरेक्टर), निवेदक गोपाळ शर्मा यांच्यासह कुमार नवाथे**

पहिल्या मजल्यावर छोटा फ्लॅट घेतला. एखाद्या कामात स्वत:ला पूर्णपणे झोकून देणे हा कुमारचा स्थायीभाव. एखादे वेड जोपासावे ते कुमारनेच! याचे उत्तम उदाहरण म्हणजे रेडिओ सिलोन!

कुमारचा दिवस रेडिओ सिलोनबरोबर उगवतो आणि त्याबरोबरच मावळतो असे म्हटल्यास वावगे ठरू नये. टीव्ही या नवीन माध्यमाने रेडिओ आणि सिनेमावर आक्रमण केले. रेडिओवरच्या जाहिराती कमी झाल्या म्हणून रेडिओ सिलोनला आर्थिक चणचण भासू लागली. त्यांनी आपल्या हिंदी प्रसारणाची वेळ हळुहळू कमी करण्यास सुरुवात केली. सायंकाळचे प्रसारण ठप्प झाले. रेडिओ सिलोन म्हणजे कुमारची लाडकी प्रेयसी! तिच्यावर आलेल्या आर्थिक संकटाने कुमार प्रचंड अस्वस्थ झाला. सुधीर मोघेंना घेऊन कुमार तडक श्रीलंकेत रेडिओ सिलोनच्या कार्यालयात जाऊन थडकला. तिथल्या स्टेशन डायरेक्टरना भेटून कुमारने हे प्रसारण पूर्वीप्रमाणेच चालू ठेवण्याची विनंती केली. दै. लोकसत्तामध्ये या विषयावर भावपूर्ण आणि अभ्यासपूर्ण लेख लिहून जनजागृती केली. कुमारप्रमाणेच इंदौरचे संगीतप्रेमी कैलास शुक्लाही यासाठी प्रयत्नशील होते. या दोघांनी रेडिओ सिलोन व आपले परराष्ट्रखाते यांच्याशी पत्रव्यवहार केला. दिल्लीला 'सार्क परिषद' भरली होती. तिथे जाऊन सिलोनच्या राज्यकर्त्यांच्या गाठीभेटी घेतल्या. शेवटी त्यांच्या अथक प्रयत्नांना यश आले आणि रेडिओ सिलोनचे प्रसारण पूर्ववत चालू झाले. या आनंदाप्रीत्यर्थ ३० एप्रिल २०१२ रोजी रेडिओ सिलोनचा ६० वा वाढदिवस कैलास गुप्ता, विजय किशोर दुबे (सिलोन रेडिओचे पहिले प्रोग्रॅम डायरेक्टर), निवेदक गोपाळ शर्मा, श्रीमती खटाव (पद्मिनी परेराची मैत्रीण), कुमार नवाथे, दिलीप चावरे यांच्या उपस्थितीत माझ्या घरी मोठ्या थाटामाटात साजरा केला गेला. त्यानंतर गेल्या वर्षी रेडिओ सिलोनच्या लोकप्रिय निवेदिका पद्मिनी परेरा भारतभेटीसाठी आल्या होत्या. त्यावेळी कुमारने हातातील सर्व कामे बाजूला टाकून त्यांच्याबरोबर महाराष्ट्रात दौरा केला.

रेडिओ सिलोनसारखेच कुमारने लंडनच्या पबवरही भन्नाट प्रेम केले. 'भन्नाट' हा शब्दही कुमारचाच! त्यांची चित्रविचित्र नावे, इंटिरिअर, तेथील आल्हाददायी वातावरण पाहून कुमार नुसता भारावून गेला होता. या लंडन पब संस्कृतीवर कुमारने एक विस्तृत लेख लिहिला होता. दुर्दैवाने आता ही पब संस्कृती अस्तंगत होण्याच्या मार्गावर आहे.

आजही कुमार पुण्यात असला तर सायंकाळी ब्रिटिश जमान्यातील बोट क्लबवर अथवा डेक्कनवरील हिंदू जिमखान्यात हमखास भेटणार. दुसऱ्याला त्रास न होता आपले आयुष्य आनंदाने कसे जगावे, हे कुमारकडून शिकावे. २३ जानेवारी हा कुमारचा वाढदिवस. आपला सत्तरावा वाढदिवस कुमारने जुन्या मित्रमंडळींच्या सहवासात उंची मद्य आणि मधुर संगीताच्या बेहोशीत आठवणी जागवत साजरा केला. तो साजरा करतानाही सर्व मित्रपरिवार एकत्र भेटणार आहे याचा आनंद त्याला अधिक होता.

यावेळी त्याच्या 'नाझी नरसंहार'च्या इंग्रजी आवृत्तीचे अनौपचारिक प्रकाशन कुमार केतकर यांच्या हस्ते झाले. त्याचे 'नाझी नरसंहार' हे पुस्तक व लिखाण सुरू असलेले 'कंबोडियातील पोल पॉटच्या जनसंहारा'चे पुस्तक म्हणजे मानवी संहारावरची, जगात बोकाळत चाललेल्या सत्तांध प्रवृत्तीची, वांशिक-धार्मिक-भाषक बेगडी अस्मितांची व माणूसपण हरवत चालल्याबद्दलची अस्वस्थता आहे. त्याचे लिखाण म्हणूनच काळजाला भिडते. त्यावर प्रतिक्रिया देण्यासाठी त्याला रात्री बारा वाजताही फोन करण्याची इच्छा वाचकाला होते यातच त्याच्या लेखनामागची कळकळ स्पष्ट होते.

त्याची तळमळ, आवड, झपाटलेपण आणि निरीक्षण त्याच्या बोलण्यातून सहजशैलीत येत राहिले, हीच त्याच्या उत्तम लेखक होण्यामागची खरी कारणे आहेत.

त्याने लिहिलेले लेख, पुस्तक परीक्षणे यातून तो आपल्याला भेटत असतो. त्याची ही लेखणी अधिक बहरावी अशीच त्याच्या सत्तरीनिमित्त शुभेच्छा.

**– अरुण पुराणिक**
इ-१०३, महेश्वरीनगर,
एमआयडीसी, अंधेरी (पूर्व),
मुंबई-४०००९३
भ्रमणध्वनी : ९३२२२१८६५३
vgpuranik@gmail.com

## रसिक वाचकहो!

एखादे वाङ्मयीन नियतकालिक जेव्हा ५० वर्षे पूर्ण करते तेव्हा तो त्या मासिकाबरोबरच वाचकांचाही सन्मान असतो, कारण अशी वाङ्मयीन नियतकालिके समाजात वाचनसंस्कृतीचे संवर्धन करत असतात. १९६४ साली सुरू झालेले 'ललित' मासिक पन्नास वर्षे पूर्ण करत आहे हा आपल्या सर्वांसाठीच आनंदाचा आणि अभिमानाचा सोहळा आहे. यानिमित्त आम्ही इतर अनेक वाङ्मयीन उपक्रमांबरोबरच पुढील दोन महत्त्वाचे उपक्रम हाती घेत आहोत.

ललित
सुवर्णमहोत्सवी वर्ष २०१३
(जानेवारी २०१३ ते डिसेंबर २०१३)

'ललित' मासिकाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त जानेवारी ते डिसेंबर २०१३ या कालावधीत कायमचे संग्राह्य ठरतील व अभ्यासकांस दिशादर्शक होतील असे दहा विशेषांक व एक दिवाळी अंक असे एकंदर अकरा अंक प्रकाशित होणार आहेत. अंकांचे विषय व अतिथी संपादक पुढीलप्रमाणे –

**वाचनसंस्कृती** (संजय भास्कर जोशी), **कविता** (वसंत पाटणकर), **ललित गद्य** (वि. शं. चौघुले), **समीक्षा** (विलास खोले), **वाङ्मयीन नियतकालिके** (सतीश काळसेकर), **चरित्रे–आत्मचरित्रे** (मीना वैशंपायन), **कथा** (पुष्पलता राजापुरे–तापस), **दृश्यकला** (वसंत सरवटे/दीपक घारे), **नाटक** (अनंत देशमुख), **कादंबरी** (नागनाथ कोत्तापल्ले) आणि नेहमीप्रमाणे दर्जेदार **दिवाळी अंक**.

हे सर्व अंक 'ललित'च्या वर्गणीदारांस त्यांच्या वर्गणीतच दिले जाणार आहेत. जे अजून ललितचे वर्गणीदार नसतील त्यांनी ताबडतोब वर्गणीदार व्हावे आणि या वाचनीय व अभ्यासनीय अंकांचा लाभ घ्यावा.

जानेवारी २०१३ पासून 'ललित' मासिकाच्या वर्गणीचे दर पुढीलप्रमाणे आहेत :

**वार्षिक वर्गणी : २८० रुपये**

**चार वर्षांची सवलतीची वर्गणी : १००० रुपये**

## ललितची वर्गणी म्हणजे सांस्कृतिक भविष्यासाठी 'इन्व्हेस्टमेंट'!

- **आपल्या प्रियजनांची वर्गणी भरा आणि खास भेट मिळवा :**
- **५ वर्गणीदारांची ४ वर्षांची वर्गणी मिळवून दिल्यास ५०० रुपयांची 'मॅजेस्टिक'ची भेट पुस्तके घरपोच!**

**ललित सुवर्णमहोत्सव समिती**

अध्यक्ष
**मधु मंगेश कर्णिक**
कार्याध्यक्ष
**वसंत सरवटे**

सदस्य
**विलास खोले**
**मीना वैशंपायन**
**अनंत देशमुख**
**संजय भास्कर जोशी**

सचिव
**शुभांगी पांगे**
निमंत्रक
**अशोक केशव कोठावळे**

वर्गणीचा डीडी/मनिऑर्डर **'ललित मासिक'** या नावाने ३०८ फिनिक्स, ४५७ एस. व्ही. पी. रोड, गिरगाव, मुंबई–४०००04 या पत्त्यावर पाठवावी किंवा 'ललित'च्या बँक ऑफ महाराष्ट्र, गिरगांव शाखेच्या २००५३७०१००६ या बँक खात्यात जमा करून majesticph@gmail.com या इमेलवर पैसे भरल्याचे तपशील कळवावेत.

# द अक्युज्ड

## अपर्णा पाटील



'मी काय कपडे घातलेत हे पाहून, समोरच्याला त्याने माझ्यावर बलात्कार करावा याचा परवाना मिळत नाही.' एका सिनेमातल्या संवादातलं एक वाक्य आठवलं. सिनेमा पाहून बराच काळ लोटला, पण ते वाक्य लख्खपणे कायम लक्षात राहिलं. दिल्लीतल्या घटनेनंतर पुन्हा एकदा स्त्रियांचं पाश्चात्त्य राहणीमान, स्त्री शुद्धतेच्या-पावित्र्याच्या संकल्पना, तिचे पेहराव आणि एकूण आधुनिक राहणीमानाविषयीची जी काही गरळ ओकली गेली, तेव्हा राहून-राहून ते वाक्य आठवत राहिलं. घरी रात्री उशिरा परततेय, म्हणून तिच्यावर बलात्कार करायचा अधिकार दिल्लीतल्या त्या पुरुषांना मिळाला होता का?

पूर्वी 'बलात्कार' या विषयाला थेट हात घालणारा हॉलिवूडचा 'द अक्युज्ड' हा पहिला सिनेमा होता. हा सिनेमा एका सत्यघटनेवर आधारित होता. सिनेमा जितका चर्चिला गेला, तितकीच अमेरिकेतील ती घटनाही. विशेष म्हणजे ती घटना आणि हा सिनेमा दोन्ही गोष्टींना इतके पैलू आहेत, की आज ती घटना घडून तीस वर्षं उलटल्या-नंतरही त्यातल्या अनेक गोष्टींची चर्चा अपूर्णच राहिली की काय, असं वाटून जातं. विशेषतः गेल्या १६ डिसेंबरला भारताच्या राजधानीत घडलेल्या त्या घटनेनंतर तर जरा जास्तच!

दिल्लीच्या रस्त्यावर एका धावत्या बसमध्ये झालेला तो सामूहिक बलात्कार ही घटना कधीही न विसरता येणारी. पण त्या घटनेनंतर काय झालं, राजकारण्यांनी आप-आपल्या बुद्धिमत्तेप्रमाणे मुक्ताफळं उधळली. एखाद्या घटनेनं आजवर पेटून न उठणाऱ्यांनी मेणबत्तीमोर्चे काढले. तिथेही काही महिलांशी लगट करून प्रसंगाचं गांभीर्य नाहीसं केलं. कोणी तिचं नाव जाहीर करा असं सुचवू लागला, तर कोणी तिनं एवढ्या रात्री आपल्या मित्राबरोबर सिनेमाला का जावं, अशा वादाला तोंड फोडलं. ज्यानं-त्यानं यात फक्त आपलं नाव पेपरात, बातम्यांत कसं राहील, एवढंच पाहिलं. एवढं सगळं पाहिलं, वाचल्यानंतर सहज वाटून गेलं, ती मुलगी जिवंत राहिली असती तर? या प्रश्नाचं उत्तर शोधताना डोक्यात सहजच 'द अक्युज्ड'-मधली सारा आठवली.

'द अक्युज्ड' सिनेमातली सारा एका बारमध्ये आली असताना तिच्यावर सामूहिक बलात्कार होतो. बारमध्ये तेव्हा असलेले लोक नराधमांना रोखून तिला मदत करण्याऐवजी मजा पाहत राहतात. त्या घटनेनं सैरभैर झालेली सारा बारबाहेर पळून लिफ्ट घेत घराचा रस्ता पकडते. कॉलेजमध्ये शिकणारा एक मुलगा, जो एका बलात्काऱ्याचा मित्र असतो, तो बाहेर येऊन पोलिसांना फोन करतो. अर्थात त्यानंही तिच्यावर होणारे अत्याचार मुकाटपणे पाहिलेले असतात. साराची केस येतं ती, कॅथरिन मर्फीकडे. पण बलात्काराची केस म्हणजे सारावर पुन्हा पुन्हा बलात्कार होण्यासारखंच असतं. या सिनेमातले प्रसंग, कोर्टात सारानं मांडलेलं आपलं म्हणणं यातून संपूर्ण सिनेमा घडत जातो. साराच्या वाक्यावाक्यातून तिला स्वतःविषयी काय वाटतं, हे प्रेक्षकांपर्यंत पोहोचतं.

साराची ही कहाणी एका सत्यघटनेवर आधारित होती. शेरील ॲन अरॅजो तिचं नाव. २१ वर्षांच्या शेरीलवर १९८३ साली एका हॉटेलमध्ये सामूहिक बलात्कार झाला होता. हॉटेलच्या पूलटेबलवर तिच्यावर बलात्कार होत असताना तिथली माणसं टाळ्या वाजवत बलात्काऱ्यांना चिथावणी देत होती. कोर्टात शेरीलची केस आली तेव्हा तिनंच




बलात्काऱ्यांना चिथावणी दिल्याचा उलटा आरोप तिच्यावर झाला. तिच्यावर बलात्कार झालाय, तोही पाशवी, याकडे लक्ष वेधण्याऐवजी इतक्या रात्री ती तिथे गेलीच कशी, ती दारू प्यायली होती का, तिनं कपडे काय घातले होते, यावर सगळी चर्चा केंद्रित झाली होती.

६ मार्च रोजी शेरीलच्या मोठ्या मुलीचा वाढदिवस होता. तिच्या दोन मुली, पतीसह घरी वाढदिवसाची जोरदार पार्टी झाली होती. पार्टी संपल्यावर सिगारेट आणायला शेरील घराबाहेर पडली. नेहमीचं दुकान बंद होत म्हणून ती वस्तीपलीकडच्या बिग डेन्समध्ये गेली. तिथल्या दोघांनी तिला रोखलं आणि आपल्याबरोबर चलण्याची बळजबरी केली. विरोध करताच तिसरा तिच्या पाठून आला आणि तिला बारमधल्या पूलटेबलवर फेकलं. तिच्यावर अनेकांनी बलात्कार केला. तो प्रसंग किती भयंकर असेल, याची कल्पना करा. जेव्हा शेरीलनं आपल्यावरील हा प्रसंग पोलिसांना सांगितला त्या नोंदीत असं म्हटलंय की, जेव्हा माझ्यावर बलात्कार होत होता तेव्हा आजुबाजूच्या लोकांच्या हसण्याचे, टाळ्या वाजवण्याचे, खिदळण्याचे, ओरडण्याचे आवाज माझ्या कानावर पडत होते. कोणीही मदतीला आलं नव्हतं. त्यामुळे ती तशाच अवस्थेत उठून रस्त्यावर धावली होती. तीन कॉलेज विद्यार्थ्यांनी तिला दवाखान्यापर्यंत पोचवलं होतं. शेरीलच्या जबाबात जे काही सांगितलं गेलं, ते सगळं खोडून काढण्याचा प्रयत्न या खटल्याच्यावेळी केला गेला.

या खटल्याच्या निमित्तानं, बलात्कार प्रकरणातील पीडित महिलेला कशी वागणूक दिली जाते, ही एक गोष्ट स्पष्ट झाली. या खटल्यात चार जणांना दोषी मानण्यात आलं. त्यापैकी दोघांची निर्दोष मुक्तता झाली. जवळपास सगळ्यांना साडेसहा वर्षांच्या आसपास शिक्षा झाली. पण या शिक्षेपेक्षा जिच्यावर अत्याचार झाला तिच्या वाट्याला आलेल्या भोगाची आपण कल्पनाही करू शकणार नाही. कारण या खटल्याचं लाइव्ह कव्हरेज देत असताना प्रसिद्धी माध्यमांनी तिचं नाव जाहीर केलं.

शेरील ही पोर्तुगीज-अमेरिकन असल्यानं या प्रकरणाला पुन्हा फाटे फोडण्यात आले. पोर्तुगीज-अमेरिकन समाजातला तणाव वाढला. अमेरिकेत ही मंडळी स्थलांतरित झालेली. अमेरिकन लोकांच्या दृष्टीनं परप्रांतीय. उपरी आणि घाण करायला आलेली. शेरील अशा घरात राहणारी, जिथल्या वस्त्यांकडे लोक तिरस्काराच्याच नजरेनं पाहत. जणू तिथे राहणं म्हणजे गुन्हाच. चेरील तर बाई, मग ती तर जणू त्यातलीच! खरं तर तिच्यावर जिथे बलात्कार झाला होता, त्या ठिकाणी ती पहिल्यांदाच गेली होती. तरीही अशा ठिकाणी जाणारी बाई काय चांगल्या वळणाची असू शकते अशी भंपक चर्चा होऊ लागली. अशा ठिकाणी ती जाते म्हणजे चवचालच असणार, असे आक्षेप तिच्याविषयी घेतले गेले. अशा ठिकाणी जाऊन तिनं बलात्काराला स्वतःहून आमंत्रण दिलेलं होतं. शेरीलच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना घटना घडलेलं ते हॉटेल बदनाम आहे, याची कल्पनाही नव्हती. कदाचित शेरीललाही नसेल, अशी शक्यताही कोणीही लक्षात घेतली नाही.

शेरीलचं नाव केसच्या सुनावणीच्या वेळी घराघरांत पोहोचलं होतं. शेरील नक्की कोण हे लोकांना चेहऱ्यानं फारसं परिचित नव्हतं. पण शेरील स्वतःहून लोकांसमोर आली आणि ती महिलांच्या; विशेषतः बलात्कारितांच्या मदतीसाठी. पण लोकांनी जणू तिला बहिष्कृतच करून टाकलं होतं. खटल्यानंतर लोक तिला टाळत होते. बोलत नव्हते. त्यामुळेच ती आपल्या पती-मुलींसह मयामीला राहायला गेली. त्यानंतर अवघ्या काही वर्षांत तिचा अपघाती मृत्यू झाला.

आपल्या मुलींना घेऊन जात असताना झालेल्या कार अपघातात तिचा मृत्यू झाला. तो दिवस होता १४ डिसेंबर १९८६ आणि तिचं वय होतं अवघं २५ वर्षांचं. शेरीलची कहाणी अशा वळणावर येऊन संपली होती. तिच्या शेवटच्या वर्षात ती आनंदानं जगली

असेल, अशी आशा करूयात! तरी खरंच ती आपलं आयुष्य सर्वसामान्यपणे पुन्हा जगू शकली असेल का? इथे शंका वाटायला वाव आहे, तो तिच्या अपघाती मृत्यूमुळे. अपघात झाला ती कार शेरीलच चालवत होती. आपल्या मुलींना नाताळच्या कार्यक्रमासाठी घेऊन चालली होती. तिच्याबरोबर तिची मुलगीही होती. कदाचित तिला तीन वर्षांपूर्वीची मार्चची रात्र तर आठवली असेल, त्या दिवशीही ती आपल्या मुलींबरोबर पार्टी करून घराबाहेर पडली होती. शेरील आपल्या मृत्यूपूर्वीच्या काळात आपली ओळख लपवत जगत होती. त्यात अनेक अडचणीही होत्या, पण पर्याय नव्हता.

शेरील बलात्काराचा खटला अमेरिकेत 'बिग डेन्स रेप' नावानं गाजला. बिग डेन हे बलात्कार झाला त्या न्यू बेलफोर्ड-मधल्या हॉटेलचं नाव होतं. शेरीलच्या आयुष्यात जे काही घडलं त्याचा सिनेमा झाला. त्यात शेरीलवर बेतलेल्या साराची भूमिका करणारी ज्युडी फोस्टर ऑस्कर घेऊन घरी गेली, पण सिनेमात अगदी महत्त्वाची 'डिस्ट्रिक्ट ॲटर्नी' कॅथरिनची भूमिका करणाऱ्या केली मॅकगिल्सची कहाणीही याच सिनेमाच्या निमित्तानं लोकांसमोर आली.

हॉलिवूडमध्ये नाव कमावण्यासाठी केली मॅकगिल्स अभिनयाचं रीतसर शिक्षण घेऊन आली होती. तिच्या अभिनयाचा ठसा उमटण्याआधी ती हॉलिवूड हंक टॉम क्रूझची हिरोईन बनली. 'टॉप चार्ली'च्या भूमिकेमुळे ती लोकांच्या लक्षात राहिलीय. 'व्हिटनेस'-साठी तिला गोल्डन ग्लोब नॉमिनेशन मिळालं होतं. नाटक, टीव्हीवर तिची कारकीर्द दखल घ्यायला लावणारी ठरली. हॉलिवूडमधल्या अन्य अभिनेत्रींच्या वाट्याला येतात, त्याप्रमाणे तिच्याही आयुष्यात लग्न, घटस्फोट अशा गोष्टी आल्या.

केलीचं पहिलं लग्न झालं ते १९७९मध्ये आणि ते मोडलं १९८१ साली. त्यानंतरच्या वर्षात तिच्या आयुष्यात अशी घटना घडली की, आपण कल्पनाही करणार नाही. तिच्यावर बलात्कार झाला होता! नुसता बलात्कार नाही तर अमानुष माराहाणही तिच्या वाटेला आली होती.

तिच्या विकीपिडीयातल्या कारकिर्दीवर नजर टाकल्यास, दिसतं की तेव्हा अभिनेत्री म्हणून तिचा तेव्हा जमही बसलेला नव्हता. स्ट्रगलर असलेल्या केलीच्या वाट्याला बलात्कार आला होता, तरीही त्याच्या पुढच्याच वर्षी तिनं अभिनयाची परीक्षा पार केली होती. त्यानंतर रंगमंचावर 'लव फॉर लव' सादर केलं होतं. केलीवर बलात्कार करणाऱ्यांना शिक्षा झाली. त्या प्रसंगानंतर कोर्ट, सुनावणी या गोष्टींना सामोरं जाताना आलेल्या अनुभवांमुळे 'द अक्युज्ड'मध्ये तिने भूमिका स्वीकारली होती. तो सिनेमा येऊन आता पंचवीस वर्षांचा कालावधी होत आलाय. कदाचित काहींनी तो सिनेमा पाहिला असेल, त्यांना कॅथरिनची भूमिका करणारी केली स्वतःही बलात्काराला सामोरी गेली होती, हे माहिती नसेल.

न्यू यॉर्कमधल्या ज्युलिअर्ड स्कूलमध्ये अभिनय शिकत असताना ती एकटी राहत होती. मॅनहटनमधल्या तिच्या अपार्टमेंटमध्ये शिरलेल्या दोघांनी तिच्यावर बलात्कार केला होता. तोही चाकूच्या धाकावर. त्यानंतर केलीचं सगळं आयुष्यच बदललं होतं. मानसिक, भावनिकदृष्ट्या केली उद्ध्वस्त झाली होती. त्यातून तिला सावरायला बराच काळ गेला. नैराश्यात तिनं हॉलिवूडही सोडलं. ती पूर्णपणे ड्रग्जच्या आहारी गेली. तिचं लेस्बियन असणं, लोकांपासून ही गोष्ट लपवण्यासाठी लग्न करणं, दोन मुलं होणं, त्यानंतर पुन्हा अभिनयाकडे वळणं अशा अनेक गोष्टींमध्ये केलीचं आयुष्य कायम हेलकावत राहिलं. तिच्यावर बलात्कार करणाऱ्यांना शिक्षा झाली, पण केलीच्या भावविश्वात बलात्कार ही गोष्ट कायम ठसठसणारी राहिली.

अमेरिकेत घडलेली ती घटना, त्यावरचा सिनेमा या सगळ्या गोष्टींना आता तीस वर्षांच्या आसपासचा काळ झाला आहे. पण एक गोष्ट अजूनही तशीच आहे. बलात्काराच्या प्रकरणाबाबत प्रसिद्धी माध्यमांमध्ये असलेली असंवेदनशीलता. शेरीलच्या बाबतीत अमेरिकेतल्या प्रसिद्धी-माध्यमांनी जी अपरिपक्वता दाखवली होती, त्याहीपेक्षा जास्त बालिशपणा दिल्लीतल्या घटनेनंतर इथल्या प्रसिद्धीमाध्यमांनी केला. जणू हा एक इव्हेंट असल्याच्या थाटात त्याच्या कव्हरेजमध्ये पुढाकार घेतला. आम्हीच अशा बातम्या देणारे पहिले आहोत, हे सांगण्याचा निर्लज्जपणा करताना कॅमेरे घेऊन थेट त्या मुलीच्या घरापर्यंत पोहोचले. काहींनी तिचं नाव जाहीर करून आपण जग जिंकल्याचा आणि कायद्याला पायदळी तुडवल्याचा आनंद घेतला. एखाद्या भ्रष्टाचार प्रकरणाचं स्टिंग ऑपरेशन असल्याप्रमाणे हे प्रकरण हाताळलं गेलं. शिवाय आपण नाव जाहीर केल्यात गैर काय, याचे दाखले देण्यासाठी लोक, पोलिस कसे असंवेदनशील आहेत, हेच वारंवार सांगितलं.

काही वर्षांपूर्वी काही राजकीय नेते, महिला आयोगाच्या अध्यक्षा यांनी बलात्कारपीडित महिलेचं नाव जाहीर करून आपल्या अपार बुद्धीचं दर्शन घडवलं होतं. जाहीर माफी मागून आपल्या पापाचं परिमार्जन केल्याचा दावाही केला. आधुनिक जगात स्त्री-पुरुष भेदाभेद न मानणारा समाज बलात्काराच्या प्रकरणांमध्ये मात्र जाणता-अजाणता लिंगभेद मानतो, असंच लक्षात आलं आहे. प्रसिद्धी माध्यमं त्याला खतपाणी घालण्याचं काम करताहेत. त्यातही न्यूज चॅनेल्स आघाडीवर आहेत, ही दुर्दैवाची बाब आहे. अमेरिकेतल्या घटनेत तीस वर्षांपूर्वी प्रसिद्धी माध्यमं बेजबाबदारपणे वागली, त्याची परिणीती एका बलात्कारित महिलेचा नाहक बळी जाण्यात झाली. पण त्या घटनेपासून कोणताही बोध न घेणाऱ्या भारतीय मीडियाला यापुढे जबाबदारीनं वागायला हवं, असं कोणीही सांगत नाही हेच दुर्दैव आहे.

**- अपर्णा पाटील**
प्लॉट नं. ६०० (१०१),
गिरिजा अपार्टमेंट, खेर सेक्शन,
अंबरनाथ (पूर्व) ४२१ ५०१
aparna.patil1@gmail.com

# बलात्कार, जनक्षोभ आणि उपाय

## ॲड. नीलिमा कानेटकर

दिल्लीला १६ डिसें.२०१२ रोजी घडलेल्या अश्लाघ्य व असमर्थनीय घटनेचे पडसाद देशभर आणि भारताबाहेरील देशांतही उठले. जनक्षोभ अनावर झाला होता. जनता, त्यातही जागरूक झालेली तरुणाई रस्त्यावर उतरली. या प्रकारच्या समस्येवर विविध प्रकारचे उपाय सुचवले जात आहेत. त्यात अगदी काही भावूक म्हणावेत असे उपाय सुचवले जात आहेत.

हा जनक्षोभ उठणे स्वाभाविक आहे, योग्यही आहे, यात शंका नाही. पूर्वीपासूनच स्त्रियांवर होणाऱ्या अनेकविध अत्याचारांवर सखोल विचार होताना अभावानेच आढळतो आहे. सर्वांनीच विषयाची व्याप्ती व खोली सर्वांगाने लक्षात घेणे आवश्यक आहे, निकडीचे आहे. या विषयावर चर्चा होताना, सर्वजण एकमेकाकडे बोट दाखवत असतात, त्यावेळी ३ बोटे स्वतःकडे असतात याचे भान दिसत नाही, असे जाणवल्यामुळे या विषयात अनेक बाबींकडे लक्ष वेधण्याचा हा एक प्रयास आहे.

व्यक्तीची मानसिकता, समाज आणि कायदा यांना वेगळे काढता येणार नाही . समाजाच्या सुव्यस्थेसाठी कायदा व न्यायव्यवस्था या यंत्रणा आहेत हे वादातीत आहे. पण या यंत्रणेत कार्यरत असलेले या समाजाचेच घटक आहेत. कोणी परग्रहावरून आलेले नाहीत. अशा प्रकारचे गुन्हे करणारे व त्यावर उपाययोजना करणारे, कायदे करणारे, कायदे राबवणारे खरे तर एकाच पातळीवर आहेत. आपण बहुतेक सर्वजण समाजातील प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा यांचे बळी आहोत. लहानपणापासून घराघरातून जे वातावरण आहे, प्रत्यक्षात त्या वातावरणाचे आपण सर्व बळी आहोत. हीच वस्तुस्थिती आहे. माझे हे विधान बोचरे आहे, झोंबणारे आहे याची मला कल्पना आहे. पण प्रत्येकाने आरशात बघून स्वतःच्या नजरेला नजर भिडवली, तरी अशा प्रकारच्या घटना घडताना मी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रीत्या कारणीभूत आहे का, या आणि अशा प्रश्नांची उत्तरे काहीजणांना तरी नक्कीच मिळतील.

या विषयाला कुटुंबाची मानसिकता, समाजाची मानसिकता, समाजाची स्वकेंद्रीत वृत्ती, कायदा आणि सुव्यवस्था राबवणाऱ्या यंत्रणेची दयनीय स्थिती, राज्यकर्ते-राजकारणी लोकांची वेळ मारून नेण्याची तथाकथित मुत्सद्देगिरी, प्रसार माध्यमांचा, दूरदर्शन व सिनेमासृष्टीचा प्रभाव या आणि अशा अनेक बाजू आहेत.

व्यावसायिक निरीक्षणातून निदर्शनास आलेली सामाजिक कारणे –

- आपल्या देशातील कुटुंबात मुलगा होणे या घटनेला अवास्तव महत्त्व दिले गेले आहे.
- मुलांना व मुलींना सर्वच बाबतीत कुटुंबातील सदस्यांकडून भेदभावाची वागणूक दिल्यामुळे मुलांना साहजिकच चुकीचे संदेश मिळत जातात.
- ज्या कुटुंबात स्त्रियांना अनादराने वागवले जाते, त्यांच्यावर अत्याचार झालेले मुलांनी बघितलेले असले तर तसेच संस्कार घेऊन घरातील विविध वयातील पुरुष स्त्रियांचा अनादर करण्याचे जणू कुटुंबातून प्रशिक्षणच घेतात.
- आपण अन्यायाविरुद्ध आवाज उठवायचा नसतो हीच स्वाभिमानशून्य शिकवण आपण घराघरातून आपल्या मुलींना देतो.
- मुलींना सतत दबावाखाली, धाकात ठेवण्यात घराण्याची प्रतिष्ठा मानतो.
- घराघरातून स्त्रीभ्रूण हत्या बोकाळली आहे त्या सर्व घरांतून अर्थातच स्त्रीकडे बघण्याची दृष्टी दूषितच राहणार आहे. निश्चितच त्या घरातील वयाने लहानथोर सर्व पुरुषवर्ग अहंगंडाचे रोगी असतात.

शाळा-कॉलेजमध्येही फार वेगळे वातावरण आहे असे अभावानेच जाणवते. प्रसारमाध्यमेही पुरुषप्रधान सुसंकृतीचा कळत-नकळत पुरस्कारच करतात. त्यांच्या मालिकांतून करारी-कणखर स्त्रिया न दाखवता कजाग, भांडखोर, कटकारस्थाने करणाऱ्या स्त्रियांना प्राधन्य दिले जाते. स्त्रीच्या सोशिकतेचा कडेलोट झालेला दाखवण्यात धन्यता मानली जाते.

राष्ट्रीय व राज्य पातळीवर खाजगी-रीत्याही या विषयासंबंधी बरेच अभ्यासपूर्ण संशोधन झाले आहे . अशा समस्यांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न वेळीवेळी झाला आहे. अनेक अभ्यासू बुद्धिमान अधिकारी व त्यांचे सहकारी अथक मेहनत घेऊन माहिती गोळा करतात, त्या माहितीचे विश्लेषण करून उपायही सुचवतात. अनेक वेळा असे संशोधन भ्रष्टाचाररहित होते म्हणूनच त्याची विश्वसनीयता असते. तरी पण अशा प्रयत्नांकडे, बहुतेक वेळा उपहासाने पाहिले जाते. अनेक वेळा, असे अहवाल धूळ खात पडतात. त्यांच्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. त्यात सुचवल्याप्रमाणे परिणामकारक उपाय योजले जात नाहीत. अर्थात याची कारणेही अनेक आहेत. अनेकदा समस्या सोडवायच्या दृष्टीने सकारात्मक विचार केला

| गुन्ह्याचे स्वरूप | २००२ | २००६ | २००७ | २००९ |
|---|---|---|---|---|
| बलात्कार | १६३७३ | १९३४८ | २०७३७ | २१३९७ |
| लैंगिक शोषण | १०१५५ | ९९६६ | १०९५० | ११००९ |
| अपहरण | १४५०६ | १७४१४ | २०४१६ | २५७४१ |
| हुंडाबळी | ६८२२ | ७६१८ | ८०९३ | ८३८३ |

जात नाहीच, उलट, या समस्या सोडवता कशा येणार नाहीत यावरच भर दिला जातो. येथे खरे तर संबंधितांच्या इच्छाशक्तीचा अभाव आढळतो. तरी वरील आकडेवारीनुसार स्त्रियांसंबंधीच्या गुन्ह्यांमध्ये वाढ झाल्याचेच आढळते.

या विषयात हाती आलेल्या एका अहवालानुसार स्त्रियांवर होणाऱ्या विविध अत्याचारासंबंधी काही पाहणी व उपाययोजना सुचवल्या गेल्या आहेत. आपल्या देशात कॉन्फरन्स ऑफ सेंट्रल ॲण्ड स्टेट स्टॅटिस्टिकल ऑर्गनायझेशनची स्थापना झाली. या यंत्रणेखाली २१ ऑक्टोबर २०१० रोजी देशातील गुन्ह्यांसंबंधी संशोधन करण्याचे योजले गेले. सर्वत्र देशातील गुन्ह्यांची नोंदणी करणाऱ्या सुमारे ९ खात्यांची, विविध यंत्रणांची, मदत घेतली गेली. या विषयी मिळालेल्या माहितीचे सखोल विश्लेषण करून उपाययोजनाही सुचवल्या आहेत. समाजातील अनेक घटकांची यासाठी साथ असावी लागेल. या संबंधीचा अहवाल २९ जून २०११ रोजी संबंधित अधिकाऱ्यांकडे सोपवला गेला हे विशेष.

या अधिकृत अहवालाआधारे पुढील बाबी प्रकर्षाने नजरेत भरल्या.

दरवर्षी आपल्या देशात फार मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढते.त्या पार्श्वभूमीवर आपल्या देशात ज्या प्रमाणात गुन्हे घडतात त्यापेक्षा नोंदणी झालेल्या गुन्ह्यांची आकडेवारी फारच कमी आहे. देशातील स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण आणि त्याची झालेली नोंदणी हे प्रत्यक्ष प्रमाण फारच व्यस्त आहे, हास्यास्पद आहे असे दिसते.

स्त्रियांवरील अत्याचारांसंबंधी नोंदणीकृत माहिती नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हे-३,२००५-०६ या अधिकृत खात्याच्या अहवालातून घेतली आहे.

या अहवालाच्या माहितीच्या आधारे ३५.४ % स्त्रियांवर शारीरिक व लैंगिक अत्याचार झाले. १५-४९ या वयोगटातील या स्त्रिया होत्या. बिहार, राजस्थान, मध्यप्रदेश, त्रिपुरा या भागांत हे प्रमाण ४५ % होते. या अहवालानुसार १५-४९ या वयोगटातील स्त्रियांवर अत्याचार झाल्याच्या सुमारे ९९.३३ दशलक्ष नोंदी आहेत असे समजते. नोंदी न झालेले स्त्रियांवरील अत्याचार किती मोठ्या प्रमाणात असतील याची कल्पनाही करणे भीतिदायक ठरते.

अशा घटनांमध्ये कुटुंबातून ही या गुन्ह्यांकडे गांभिर्याने पाहिले जात नाही. पोलिस यंत्रणाही अशा गुन्ह्यांकडे फारसे लक्ष देत नाही. ही वस्तुस्थिती आहे.

अनेकदा गुन्हे दाखलच केले जात नाहीत कारण पीडित व्यक्ती गुन्हा नोंदवण्याचे धाडस करत नाही. तसे धाडस केलेच तरी पोलिस यंत्रणा गुन्हे दाखल करून घेण्यात हयगय करतात.

या आणि अशा सर्वच कारणांमध्ये बहुतांश तथ्य असते, हे एक विषारी सत्य आहे.

या प्रकारात पीडित स्त्रीला सुरक्षित वाटत नाही. ती अनेक प्रकाराने मानसिक व शारीरिक धक्क्यातून बाहेर येणे मुश्किल होते. नातेवाईकांचा आधार नसतो. सामाजिक दडपण, खोट्या प्रतिष्ठेच्या कल्पनांची ती बळी ठरते. या सर्व प्रकाराने अनेकदा पीडित स्त्री पोलिस यंत्रणा व न्याय यंत्रणेची मदत घेण्यापासून स्वतःला दूर ठेवते.

**कायद्याचे संरक्षण (?)**

स्त्रीला घरात व घराबाहेर संरक्षण देणारे अनेक कायदे झाले आहेत, होत आहेत, पण या विचारांबद्दलही उलटसुलट विचारप्रवाह आहेत. कायदे आहेत परंतु ते राबवणाऱ्या यंत्रणा परिणामकारक नाहीत. यंत्रणेतील अधिकाऱ्यांत संवेदनाशीलतेचा अभाव आहे. अनेक पुरुष न्यायाधीश अथवा पोलिस यंत्रणेतील अधिकारीही वर उल्लेख केलेल्या वातावरणात वाढलेले आहेत. त्यातील अनेकांचे शिक्षणसंस्कार तसेच झाले आहेत. खटले-दावे संपवण्याच्या नादात, न्यायदान होताना दिसते असे नाही. निवाडे मात्र होतात. सगळ्या पातळ्यांवर शॉर्ट कट घेण्याकडे कल असतो.

गुन्हा सिद्ध होईपर्यंत आरोपी गुन्हेगार ठरत नाही. निर्दोष व्यक्तीवर अन्याय होऊ नये याची काळजी घेतली जाते. अर्थात नेहमीच तसे घडते असेही नाही. पोलिस अधिकाऱ्यांवर, न्याययंत्रणेवर, कामात चुकारपणा केल्याबद्दल, भ्रष्टाचारावर अंकुश नाही .

सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचा इतर न्यायालयांतून न्यायदान करताना विचार होतो असे नाही.

हाती आलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रात २०१० साली १५९९, २०११ साली १७०१ बलात्काराचे गुन्हे दाखल झाले. त्यापैकी सर्वात जास्त गुन्हे मुंबई शहरात घडले अशी आकडेवारी आहे. याचा अर्थ ग्रामीण भागात हे गुन्हे झाले नाहीत असे नाही, पण त्याची दखल घेतली गेली नाही असाही होतो. महाराष्ट्रात आज जवळजवळ १४००० बलात्काराचे खटले न्यायप्रविष्ट आहेत असे समजते.

किती गुन्हेगारांना शिक्षा झाली हा वेगळा आणि मोठाच विषय आहे. लैंगिक शोषण आणि विनयभंगाच्या गुन्ह्यामध्ये ५ % खटल्यांत गुन्हेगारांना शिक्षा झाली असे समजते.

- अरुणा शानभागच्या खटल्यातला गुन्हेगार सुमारे पाच वर्षे तुरुंगात राहिला, नंतर सुटलाही. त्यानंतर त्याने दिल्लीला वॉर्ड बॉय म्हणून कामही केले! नंतर त्याचे निधनही झाले असे समजते. अरुणा मात्र अजूनही

हॉस्पिटलमध्ये कोमात आहे .

- काही महिन्यांपूर्वी ६ वर्षांच्या अजाण बालिकेवर बलात्कार करून, तिला ठार मारून, रस्त्याच्या कडेला तिचा मृतदेह टाकून दिलेल्या एका विकृत माणसाचा माफीचा अर्ज मान्य होऊन त्याची फाशी टळते.
- पुरेसा पुरावा नाही या कारणाने आरोपी सुटतातच, पण जामीनावर सुटलेले आरोपीही अनेकदा त्याच प्रकारचे गुन्हे करताना आढळतात.

बलात्कारासंबंधीच्या कायद्यात त्रुटी आहेतच, पण कायद्यात पूर्वी काही बदलही झाले आहेत. मात्र त्या बदलांचा, सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा परिणामकारक विचार होऊन न्यायदान होताना क्वचितच आढळते.

फाशीची शिक्षा आपल्या देशात देता येते, पण यावर अनेकानेक विचारप्रवाह देशात व आंतरराष्ट्रीय पातळीवर आहेत. अशावेळी फाशीची शिक्षा कमी वेळा दिली जाते, त्याची अंमलबजावणी होण्यात वेळ लागतो असाच आजवरचा अनुभव आहे. बलात्काराच्या गुन्ह्यात फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी होते आहे, परंतु गुन्हा सिद्ध होण्यातील पोलिस तपासातील त्रुटी, न्यायालयीन अडचणी, पोलिसांची, न्यायाधीशांची मानसिकता जोपर्यंत बदलत नाही तोपर्यंत पीडितांना न्याय मिळणार नाही.

बलात्कार करणाऱ्या गुन्हेगाराच्या इंद्रियाचे खच्चीकरण करावे, हाही मतप्रवाह वाहतो आहे, पण भारतीय दंडविधानाच्या अंतर्गत हे करता येणार का? मानवीहक्कावर सातत्याने काम करणारी यंत्रणा हे होऊ देणार का ?

बलात्काराचे खटले चालवण्याच्या प्रक्रियेतील त्रुटी दूर करण्यासाठी काही उपाय सुचवता येतील –

गुन्ह्याची नोंदणी व चौकशी

१. पीडित व्यक्तीचे निवेदन ग्राह्य धरण्या-कडे पोलिस व न्याय यंत्रणेचा कल असावा.
२. तांत्रिक अडचणी दाखवून पीडिताला ठिकठिकाणच्या पोलिस ठाण्यावर भटकवू नये. तक्रार ताबडतोब नोंदवावी.
३. वैद्यकीय अहवाल ताबडतोब मिळवावा.
४. स्त्रियांवरील अत्याचाराच्या नोंदी जबाबदार महिला पोलिसवर्गाने कराव्या.
५. बलात्काराचा गुन्हा नोंदवण्यात हयगय वा कुचराई केलेली आढळली तर त्या विशिष्ट पोलिस ठाण्याला संघटितपणे किमान २५०००/– रुपये अथवा जास्त रकमेचा न्यायालयीन दंड व्हावा. हा दंड संघटितपणे, हजर असलेल्या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भरावा. हा दंड हजर असलेल्या प्रत्येकाच्या पगारातून दर महिना कापला जावा.
६. या कामामध्ये विशेष कामगिरी दाखवणाऱ्या पोलिस गटाला विशेष पुरस्कार/बक्षीस/बढती/पगारवाढ द्यावी.
७. घटनेनंतर २४ ते ४८ तासात प्राथमिक चौकशी पुरी व्हावी व कनिष्ठ न्यायालयासमोर त्याचा अहवाल सादर व्हावा.
८. पोलिस यंत्रणेतील अधिकाऱ्यांना व इतर निम्नस्तरीय कर्मचाऱ्यांना हे विषय हाताळण्याचे विशेष प्रशिक्षण देणारे अभ्यासक्रम असावेत. त्यात पुरावे गोळा करण्याचेही विशेष प्रशिक्षण द्यावे.
९. न्याययंत्रणेतील अधिकाऱ्यांसाठीही विविध पातळींवर विशेष प्रशिक्षण देण्याची सोय असावी. त्यायोगे स्त्रियांवरील अत्याचाराचे खटले/दावे परिणामकारकरीत्या हाताळले जातील.

**न्यायालयीन प्रक्रिया**

१. आरोपीला जामीन मिळू नये.
२. इंडियन एव्हिडन्स ॲक्टच्या कलम ११३ अ अंतर्गत, विवाहानंतर ७ वर्षांत जर विवाहित महिलेचा आत्महत्येने मृत्यू झाला तर सासरच्या नातेवाईकांना ते निर्दोष असल्याचे सिद्ध करावे लागते. तसेच इंडियन एव्हिडन्स ॲक्टच्या कलम ११३ ब अंतर्गत मृत महिलेच्या मृत्यूआधी हुंड्यासाठी छळ झाला होता असे आढळले तर सासरच्या सदर व्यक्तीला निर्दोषत्व सिद्ध करावे लागते.
३. इंडियन एव्हिडन्स ॲक्टच्या कलम ११४ अ अंतर्गत बदल केला आहे त्यामध्ये बलात्कारित स्त्रीच्या शरीरावर जखमा आढळल्या असतील, तर तिने या जबरदस्तीच्या शरीरसंबंधाला मान्यता दिली नव्हती, तिचा या शरीरसंबंधास विरोध होता असे मानावे, असे स्पष्ट म्हटले आहे.
४. गुन्हेगारांची ओळख पटल्यावर, ते निर्दोष आहेत हे सिद्ध करण्याची जबाबदारी आरोपींची असावी. याची कडक अंमलबजावणी व्हावी.
५. या विषयी पीडित व्यक्तीला न्यायालयात, अती बेजार न करता इतर पुरावे लक्षात घ्यावेत, असेही सर्वोच्च न्यायालयाचे मार्गदर्शन आहे.
६. न्यायालयात साक्षी–पुरावे नोंदताना 'इन कॅमेरा' म्हणजेच बंद खोलीत, पीडित व्यक्तीची तपासणी, उलट तपासणी घ्यावी. तपासणी व उलटतपासणीचे काम करण्यासाठी, पुरुष न्यायाधीशांनी स्त्री कायदेतज्ज्ञ नेमावी. तपासणीच्या, नोंदणीच्या कामासाठी टंकलेखिका स्त्री नेमावी. या विशिष्ट कामासाठी दोन्ही बाजूकडून स्त्री कायदेतज्ज्ञ/वकील नेमावेत. अशावेळी पीडित व्यक्तीला उत्तरे देणे सोयीचे असेल. भर न्यायालयात पीडित व्यक्तीची अधिक मानहानी होणार नाही याची खास खबरदारी घ्यावी.

**न्यायालयीन शिक्षेचे स्वरूप**

या घटनेतील स्त्रीचे जीवन बहुतेक वेळा छिन्नविछिन्न झालेले असते. तिच्या अपमानाला, मानहानीला पारावार नसतो.

'नर प्रवृत्ती' असलेल्या गर्विष्ठ पुरुषवृत्तीला, अपमानाची, मानहानीची जाणीव होणे तितकेच महत्त्वाचे आहे. त्याला मृत्युदंड देऊन त्यातून सहज सुटका

मिळेल, मात्र त्याने केलेल्या गुन्ह्याचे त्याच्या आयुष्यावर किती दूरवर परिणाम होऊ शकतात याची जाणीव त्याला व इतरांनाही होणे अत्यावश्यक आहे.

१. गुन्हा सिद्ध झाला तर अशा गुन्हेगाराची गाढवावर उलटे बसवून, त्याचे तोंड काळे करून, शहरात पोलिस संरक्षणात वाजतगाजत धिंड काढावी. जागो-जागी त्याच्या छायाचित्राची भित्ति-पत्रके लावावीत.

त्याशिवाय,

२. गुन्हेगाराला तडिपार करून, आमरण, कठोर सश्रम, काळ्या पाण्याची, कडक शिक्षेची (तेलाच्या घाण्यावरचा कोलू चालवणे अथवा इतर) तरतूद असावी.

३. त्याला त्याच्या कुटुंबीयांपासून अथवा इतरांपासून आमरण दूर ठेवावे. कोणासही कोणत्याही परिस्थितीत त्याला भेटण्याची परवानगी नसावी.

४. देशाच्या अधिकार कक्षेतील निर्जन ठिकाणी अशा प्रकारची कारागृहे असावीत.

५. कडक शिक्षेची कठोर अंमलबजावणी व्हावी.

६. कोणत्याही परिस्थितीत शिक्षा कमी करून घेता येऊ नये.

७. त्याची जगण्यापुरत्या अन्नाची, अंग झाकण्यापुरेशाच कपड्याची सोय व्हावी. झोपायला पांघरायला कांबळे द्यावे. (चैनीची सोय नव्हे). त्याच्यावर सरकारने, त्याच्या जगण्यापुरेसा खर्च करावा.

८. ज्या संपत्ती व सत्तेच्या जोरावर हा गुन्हा घडला त्या गुन्हेगाराची संपत्ती मोठ्या प्रमाणात सरकारजमा करावी. पीडित व्यक्तीच्या पुनर्वसनासाठी त्या संपत्तीचा विनियोग व्हावा.

९. पीडित व्यक्तीला मोठ्या प्रमाणात नुकसान भरपाई देण्याची सक्ती असावी.

१०. गुन्हेगाराचे राजकीय स्थान पूर्णपणे मोडीत काढावे.

११. गुन्हेगाराचे भारतीय नागरिकाचे सर्वाधिकार काढून घ्यावेत.

१२. सेवाभावी संस्था पीडितांना मदत करत असतात, त्यांचेही वेळोवेळी सल्ला, मार्गदर्शन घ्यावे.

१३. हे गुन्हे हाताळण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्ट सुरू करण्याचा विचार होतो आहे, पण त्या जोडीला वरील सूचनांचा विचार होऊ शकेल तर न्याययंत्रणा व पोलिसयंत्रणा या विषयात जास्त परिणामकारक कार्य करेल.

खोडसाळ पद्धतीने खोटे खटले दाखल केले गेले तर त्याचीही न्यायालयाने गंभीर दखल घ्यावी व संबंधितांना योग्य त्या शिक्षा ठोठाव्यात.

प्रत्येक नागरिकाने बघ्याची भूमिका सोडून देऊन स्वतःच्या जबाबदाऱ्या पाळणेही आवश्यक आहे.

● घराघरातून स्त्रीवर्गाला, मुलींना सन्मानाने जगता यावे याबद्दल कुटुंबातील प्रत्येक सदस्याने जागरूक राहावे. मोठ्या प्रमाणात आज जो तरुणवर्ग रस्त्यावर उतरला आहे त्याने स्वतःच्या घरातही सक्षमतेचे निकोप वातावरण राहावे याबद्दल विशेष जागरूक राहावे.

(दुर्दैवाने आमच्या पिढीकडून फारशी अपेक्षा ठेवता येत नाही, पण तरुणाईने त्यांची ताकद दाखवली आहे. हे चित्र आशादायी आहे.)

● या उठावाचे स्वरूप एक थ्रिल/एक फॅड इतपत राहू नये.

● स्त्रियांनी, मुलींनी स्व-संरक्षणासाठी जागरूक राहून आवश्यक ते शिक्षण घ्यावे. कुटुंबीयांनी यासाठी त्यांना सहकार्य करावे, उत्तेजन द्यावे.

● शाळा, कॉलेजमधून हे शिक्षण घेण्याची सक्ती असावी.

● घटनास्थळी अशा प्रकारांचा संघटित प्रतिकार व्हावा, प्रतिबंध व्हावा.

● वेळप्रसंगी साक्षी-पुराव्यांसाठी न्यायालयात जावे लागले तर हयगय करू नये, निष्काळजीपणा करू नये.


● आवश्यक असेल तर साक्षीदाराला पोलिस संरक्षण द्यावे. त्यांना खरी गरज असते. राजकारणी लोकांनाच फक्त संरक्षणाची आवश्यकता असते असे नाही. राजकारण्यांनी खाजगी संरक्षक नेमावेत व त्याचा खर्च स्वतः उचलावा.

● पोलिस यंत्रणेला त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास वेळ द्यावा.

वर सुचवलेले कायद्यातील बदल आदिपथ फाउंडेशन संस्थेने जस्टिस वर्मा समितीकडे पाठवले होते. नुकत्याच वर्मा कमिटीने सरकारला कायद्यात बदल करण्यासाठी महत्त्वाच्या सूचना केल्या. मुख्यत: बलात्कार या संज्ञेची व्याप्ती वाढवली आहे. बलात्कार, पीडित मृत किंवा अपंग झाली तर गुन्हेगाराला कमीत कमी २० वर्षांची शिक्षा सुचवली आहे, परंतु सरकारच्या आदेशानुसार अशा गुन्हेगाराला फाशीची शिक्षा द्यावी असे म्हटले आहे. ॲसिड ॲटॅक झाला असल्यास गुन्हेगाराला १० वर्षांचा तुरुंगवास असावा असे म्हटले आहे. लैंगिक अत्याचार या संज्ञेची व्याप्ती वर्मा कमिटीने वाढवली. स्त्रियांवरील इतर अत्याचारांवरही ७ वर्षांची शिक्षा सुचवली आहे. सरकारच्या सूचनेप्रमाणे एक वा अधिक बलात्काराचा गुन्हा केल्यास त्या गुन्हेगारास फाशी सुचवली आहे. पोलिस कस्टडीत बलात्कार झाल्यास गुन्हेगाराला दहा वर्षांचा तुरुंगवास व्हावा, तसेच पीडित स्त्रीच्या चारित्र्यावर बोट ठेवू नये. गुन्ह्याची नोंद स्त्री पोलिस अधिकाऱ्याने करावी. आरोपीची ओळख-प्रक्रिया सुलभ करावी. अशा काही उपाययोजना नवा कायदा होण्याच्या प्रक्रियेत आहेत. तरी अन्य काही महत्त्वाच्या गुन्हांचा अंतर्भाव यात झालेला दिसत नाही.

लोकांच्या भावनांशी खेळण्यासाठी, त्यांना तात्पुरते गप्प करण्यासाठी, अनेकजण उठवळ विधाने करतात. त्यातील फोलपणा सुशिक्षित, विचारी नागरिकांना समजणेही तितकेच आवश्यक आहे. संघटित प्रयत्नातून परिस्थिती बदलता येईल.

**- ॲड. नीलिमा कानेटकर**
जी-९१, लोकमान्य नगर, कटारिया मार्ग,
माहीम, मुंबई -४०००१६
भ्रमणध्वनी ९९६७०१५१२०
neelimakantekar@gmail.com



पुन्नप्पा

# उपजत व्यंगचित्रकार – पुन्नप्पा

**प्रभाकर वाईरकर**

'नाद' लागला किंवा 'नादाला' लागला हे वाक्य आपण सर्वसाधारणपणे एखाद्याची हेटाळणी करण्याच्या उद्देशानं वा उपहासात्मक पद्धतीनं, ती व्यक्ती सर्वसामान्यांपेक्षा किती 'वेगळी' आहे हे दर्शवण्यासाठी बोलत असतो. खरं म्हणजे 'नाद' लागणं म्हणजे ब्रह्मानंदी टाळी लागणंच. कारण ज्याविषयी आपल्या मनात अती ओढ असते ती मिळवण्यासाठी सर्वस्व अर्पून जे-जे करावं लागतं त्यालाच 'नाद' लागणं असं म्हटलं तर ते वावगं ठरणार नाही.

असाच एक 'नादिष्ट' कलावंत मद्रासमध्ये वास्तुविशारद झाला. त्यात 'मास्टरी' मिळवली आणि दहा-बारा वर्षं वास्तुविशारद म्हणून अमेरिकेमध्ये भरमसाठ पगाराची नोकरीही केली. आणि अचानक १९८२ साली भारतामध्ये परतून स्वतंत्र (freelancer) व्यंगचित्रकार म्हणून पूर्णवेळ काम करू लागला. या कलेमध्ये तेवढासा पैसा मिळत नाही हे माहीत असूनही. याचं कारण तो 'त्या कलेच्या नादाला' लागला. आज तो देश-विदेशात या कलेच्या माध्यमातून आपला ठसा उमटवत आहे. त्या व्यंगचित्रकाराचं नाव आहे 'पुन्नप्पा.'


कर्नाटक राज्यातील मंगलोर या ठिकाणी त्यांचा जन्म झाला आणि सेंट ॲलिसस् (Aloysius) शाळेत शिक्षण घेतल्यावर त्यांनी पुणे येथील SSPMS या कडक शिस्तीच्या सैनिकी शाळेत शिक्षण पूर्ण केलं.

अमेरिकेत कॉलेजमध्ये असताना त्यांचे अनेक माध्यमं हाताळून चित्रं काढण्याचे प्रयोग चालू होते व त्याचवेळी एक छंद म्हणून व्यंगचित्र काढण्याचा परिपाठ सुरू झाला. त्याच कॉलेजमध्ये असताना कॉलेजच्या मॅगझिनमध्ये त्यांचं पहिलं व्यंगचित्र छापलं गेलं आणि त्यासाठी त्यांना भरपूर मानधनही देण्यात आलं. ही घटना शिकागो येथील इलिनीअस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या कॉलेजमध्ये १९७२ साली घडली.

पुन्नप्पा म्हणतात, ''१९७५ साली भारतात परतलो आणि अचानक माझी भेट भारतातील थोर व्यंगचित्रकार अबू अब्राहम यांच्याशी झाली. त्यांनी त्यावेळी 'इंडिया टुडे' या मॅगझिनसाठी व्यंगचित्रं काढण्यासाठी पाचारण केलं. एक छंद म्हणून काम करत असताना पूर्णवेळ काम करण्याची संधी इंडिया-टुडेमुळे मिळाली. भारतामधील माझं पहिलं व्यंगचित्र या मॅगझिनमधून प्रसिद्ध झालं.''

आईवडील पेशानं शिक्षक होते. आपल्या मुलानं त्याचं भविष्य घडवण्यासाठी कोणतं शिक्षण घ्यावं हे त्यानं स्वत: ठरवावं अशी मोकळीक त्यांनी आपल्या मुलाला दिली. शिवाय, घरातील वातावरण विनोद, कोटच्या, संगीत, खेळ यांनी भारलेलं असल्यानं शालेय शिक्षणामध्ये प्रावीण्य मिळवता आलं.

मी पुन्नप्पा यांची जी व्यंगचित्रं ९० व्या दशकात पाहिली ती मिड-डे या सायं-दैनिकांमध्ये. त्यावेळी मी सुद्धा मिड-डेसाठी राजकीय व्यंगचित्रं करत असे. प्रथमत: ज्यावेळी मी त्यांची व्यंगचित्रं पाहिली त्यावेळी त्यांची चित्रशैली मला आवडत नसे.



वेडीवाकडी माणसं, रेषा वेड्यावाकड्या, एक प्रकारचं 'स्क्रिबल' केल्यासारखी त्यांची चित्रं वाटत. मात्र त्यांच्या कल्पना छान असत.


हळुहळू त्यांनी त्या स्टाइलमध्ये फरक केला. त्यामध्ये साधेपणा, कमीत कमी रेषा यावर जोर देऊन त्यांनी व्यंगचित्रं काढण्यास सुरुवात केली. कल्पना जरी अतिशय चांगली असली तरी चित्रीकरण छान झालं नाही तर ते चित्र पाहावंसं वाटत नाही.

चित्रकलेचं मुख्य कार्य म्हणजे लक्ष वेधून घेणं व नंतर त्यातील इतर बारकावे व कल्पना यांचा शोध घेता येतो. पुन्नप्पा यांच्या चित्रांमध्ये बारकावे असतात. परस्पेक्टिव्हचा वापर अतिशय कमी. मुख्य विषय सोडून बॅकग्राउंड मोकळी सोडण्यात येते. ती घटना कुठे घडते याला ते जास्त महत्त्व देत नाहीत. ते मुख्यत: पॉकेट कार्टून्स काढतात, मुख्य व्यंगचित्रं फारच कमी.

त्यांच्या चित्रांतील लाइन्स झिगझॅग किंवा थरथरत्या हातानं काढल्यासारख्या असतात. चेहऱ्यावरील भाव लक्ष वेधून घेतात. व्यंगचित्रामध्ये बारकाव्याच्या ऐवजी वॉटरकलरचा थोडासा पातळ असा 'वॉश' दिलेला असतो. 'सटल्' असा. पूर्ण चित्र रंगवलं जात नाही. तरीही त्यांची चित्रं आकर्षक वाटतात. जास्तीत जास्त सफेद अवकाशाचा वापर असतो.

'शॅडो'चा वापर केलेला नसतो. चित्रांसाठी स्केच पेन वा मार्करचा वापर केलेला असतो. पुन्नप्पा नेहमीच सामाजिक विषयावरील व्यंगचित्रं काढतात. त्यामध्ये दररोज घडणाऱ्या घटनांवर भाष्य केलेलं असतं. राजकीय व्यंगचित्रं अशी चितारतात, की ती कालातीत असतात. उदाहरणार्थ, अल्पसंख्याकांचावरचा अहवाल (Minority Report) या व्यंगचित्रामध्ये अतिशय सामान्य कल्पनेचा वापर केला आहे. परंतु आशय मोठा आहे. बारीक व अगदी सामान्य माणूस हा अल्पसंख्याक दाखवला असून राजकारणी माणूस त्याच्यावर उभा राहून अल्पसंख्याकांवरील अहवाल सादर करत आहे. यामध्ये राजकीय व्यक्तींचा दांभिकपणा





अतिशय परिणामकारक दाखवला आहे. राजकीय व्यक्ती लोकांना कशी मूर्ख बनवते हे तिच्या नजरेत दिसू नये किंवा लबाडी दिसण्यात येऊ नये म्हणून काळा चष्मा वापरला आहे. म्हणजेच लबाडीची प्रतिमा म्हणून काळ्या चष्म्याचा वापर केलेला आहे. अल्पसंख्याकांवर आपण कसे अत्याचार करतो हे 'त्या' माणसाच्या खिजगणतीतही नाही, हे अल्पसंख्याकाचं प्रतीक दाखवलेल्या माणसाच्या चेहऱ्यावरील हावभाव व त्याच्या बॉडी लँग्वेजवरून सहज लक्षात येतं.

पुन्नाप्पा हे अधिकतर प्रतीकांचा वापर करतात की ज्यामुळे तो विषय लोकांच्या मनात घट्ट बसावा. आज भेसळीचा जमाना आहे. प्रत्येक गोष्टीमध्ये भरपूर प्रमाणात भेसळ होत असते. दुधामध्ये होणारी पाण्याची भेसळ




दाखवण्यासाठी किंवा भेसळ करणारे कसे 'वरचढ' झाले आहे हे त्यांनी एका व्यंगचित्रात अतिशय उपहासात्मक पद्धतीनं दाखवलं आहे.

क्रिकेटमध्ये 'फिक्सिंग' हा प्रकार किती बोकाळला आहे आणि त्याची लाजही त्यासंबंधी लोकांना वाटत नाही. अंपायरही मॅच फिक्सिंगवरून दुसऱ्याचा कसा विश्वासघात करतात हे दाखवण्यासाठी Slending Decision या व्यंगचित्रामध्ये खेळाडू आउट झाला आहे हे दाखवण्यासाठी नेहमीचं बोट उंचावून न दाखवता हाताचं 'मधलं' बोट उंचावून दाखवत आहे. (मधलं बोट उंचावणं म्हणजे काय हे सर्वांना माहीत असतं) त्याच्या चेहऱ्यावरील भाव एखाद्या लबाड कोल्ह्यासारखे आहेत.

त्यांच्या व्यंगचित्रांमध्ये नेहमीच उच्च दर्जाचा विनोद व उपहासात्मक चित्रं आढळतात. ते कधीही कमरेखाली वार करत नाहीत. नेहमीच त्यांची व्यंगचित्रं विचार करण्यास प्रवृत्त करतात.

पुन्नापा हे स्वतंत्र (Freelancer) व्यंगचित्रकार म्हणून व्यवसाय करतात. तेच त्यांचे मालक व तेच त्यांचे नोकर. हा व्यवसाय त्यांना संपूर्ण समाधान देतो, पण पैशांच्या बाबतीत ते असमाधानी आहेत. व्यंगचित्रकारांनी आपल्या आजुबाजूला जे घडतंय त्याचं सूक्ष्म निरीक्षण केलं पाहिजे आणि कोणत्याही राजकीय पक्षापासून चार हात दूर राहिलं पाहिजे, तरच तुम्ही अलिप्तपणे आपले विचार व्यंगचित्रांतून स्पष्टपणे मांडू शकाल, असं त्याचं मत आहे.

कमीत कमी शब्द वापरून चित्रामधून योग्य संदेश देणं त्यांच्या व्यंगचित्रांचं वैशिष्ट्य. इंडिया टुडे, मिड-डे, टाइम्स ऑफ इंडिया वगैरे प्रसिद्ध वर्तमानपत्रं व नियतकालिकांमधून त्यांची व्यंगचित्रं प्रसिद्ध होत असतात.

होतकरू व्यंगचित्रकारांना त्यांचा संदेश असा, की प्रत्येक विषयात झोकून देऊन काम केलं पाहिजे. विनोद हा शिकवला जात नाही. कार्टून करण्याचं तांत्रिक ज्ञान शिकवलं जातं. अन्य व्यंगचित्रकारांचं काम सतत पाहिलं पाहिजे. त्यांची कामाची पद्धत, चित्रांची स्टाइल, रचना, रंगकाम, ब्रशिंग, कॅप्शन्स वगैरे. अनुभवानंच चित्रकलेमध्ये सुधारणा होते.

पुन्नप्पा यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक पारितोषिकं मिळाली आहेत. जर्मनीमध्ये आंतरराष्ट्रीय व्यंगचित्र स्पर्धेसाठी त्यांना पंच म्हणून बोलावण्यात आलं होतं. जपान, साउथ कोरिया वगैरे ठिकाणी त्यांच्या व्यंगचित्रांचा सन्मान केला आहे. कर्नाटक सरकारनं 'राजोत्सव' या सन्मानानं त्यांना गौरवलं आहे.

आपल्या पत्नीबरोबर प्रवास करणं, पुस्तकं वाचणं, प्रवासवर्णनं लिहिणं हे त्यांचे इतर छंद आहेत. त्यांनी अनेक नाटकं लिहिली आहेत. कुर्ग येथील कॉफी व मिरीच्या मळ्यात निसर्गाशी हितगुज करत, जेवण करण्याची मजा चाखत व्यंगचित्रांचा रतीब लोकांना अविरत पुरवत आहेत...

**– प्रभाकर वाईरकर**
कावेरी, बी-४०५, वाकोला ब्रीज,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५
भ्रमणध्वनी : ९८२०५४३०८९

# स्वामी विवेकानंद

## शिरीष वीरकर

१२ जानेवारीला स्वामीजींची १५०वी जयंती देशभर साजरी झाली. अवघे ३९ वर्षांचे आयुष्य लाभलेल्या स्वामाजींच्या मृत्यूला ११० वर्षे उलटून गेली आहेत. त्यांचे विचार, त्यांचे लेखन, त्यांची भाषणे, त्यांनी दिलेली उभारी हे सर्व आजही ताजे वाटते. त्यांनी शंभर वर्षांपूर्वी सांगितलेल्या देशउभारणीच्या संकल्पना भारताच्या आजच्या परिस्थितीतही प्रसंगोचित्त वाटतात. असा हा द्रष्टा संन्यासी.

सर्वधर्म परिषदेला जाताना बोटीवरील प्रवासात स्वामींजीबरोबर जमशेदजी टाटा होते. नवभारताच्या उभारणीत उद्योजकांनी सामाजिक जबाबदारीचे भान ठेवले पाहिजे हे त्या प्रवासात स्वामीजींनी टाटा यांच्या मनावर बिंबवले. जमशेदजी टाटा यांनी 'इन्स्टिटट्यूट ऑफ सायन्स'ची केलेली स्थापना ही स्वामीजींच्या प्रेरणेने झाली. अमेरिकेमध्ये तेव्हाचे नवश्रीमंत रॉकफेलर स्वामीजींच्या सहवासात आले. आपण ज्या समाजातून संपत्ती कमावतो त्या समाजाचे आपण देणे लागतो आणि सेवेच्या माध्यमातून आपण समाजाचे ऋण फेडले पाहिजे हा सामाजिक संदेश स्वामीजींनी त्यांना दिला. रॉकफेलर फाउंडेशनची स्थापना स्वामीर्जींच्या विचारप्रभावातून झाली. उद्योगांना सामाजिक जबाबदारीची जाणीव आणि भान असावे. ही बाब त्यांनी बहुधा पहिल्यांदा अधोरेखित केली.

युरोपात ज्याप्रमाणे कला, सामाजिक जाणिवा, विज्ञान यांचे Renaissance (पुनरूत्थान) झाले. तसेच भारतात विसाव्या शतकाच्या प्रारंभी झाले. भारताच्या या पुनर्बांधणीसाठी दिशा स्वामी विवेकानंदांनी दिली. सामाजिक, राजकीय स्तरावर विवेकानंद-टिळक-गांधी अशी एक साखळीच निर्माण झाली. स्वामीजींनी देशाच्या बांधणीसाठी हाक दिली. त्यानंतर स्वातंत्र्य चळवळीला उभारी आली. कला, साहित्य, विज्ञान, तत्त्वज्ञान, सामाजिक सुधारणा या सर्वच क्षेत्रांत भारताच्या जागृतीचे शिल्पकार म्हणून विवेकानंद अग्रणी होते.



आपल्या गुरूच्या मृत्यूनंतर स्वामीजींनी सबंध भारताचा दौरा केला. भारत काय आहे हे त्यांनी समजावून घेतले. गांधीजी आफ्रिकेतून परतल्यावर त्यांनीही सबंध देश पालथा घातला. समाजपुरुषाला समाजाचे दु:ख आणि वेदना कळल्या तरच समाजाची जागृती करता येते. १८८८ ते १८९३ या काळात त्यांनी जे पाहिले त्यावर त्यांनी कन्याकुमारीला मनन केले. १८९६ साली अमेरिकेहून परतल्यावर त्यांनी भारताच्या पुनर्बांधणीसाठी त्यांची योजना कोलंबो ते अल्मोरा या प्रवासात जागोजागी दिलेल्या व्याख्यानातून जनतेपुढे मांडली.

अमेरिका दौऱ्यात त्यांना मानाच्या अशा हार्वर्ड आणि कोलंबिया विद्यापीठात पौर्वात्य तत्त्वज्ञानाची अध्यासने (chair) निर्माण करून शिकवण्याची विनंती करण्यात आली होती. आपले कार्य वेगळे असल्याचे सांगून सदर विनंती त्यांनी नाकारली होती.

अमेरिकेतून परतल्यावर जागोजागी त्यांचे भव्य स्वागत झाले. त्यावेळी बोलताना स्वामीजींनी भारताच्या नवनिर्माणाची योजना लोकांसमोर मांडली. भारतातील दारिद्र्य, अस्पृश्यता, स्त्रियांची कुंचबणा यामुळे स्वामीजी व्यथित झाले होते.

सुधारणेबद्दल स्वामीजींची मते वेगळी होती. फुटकळ स्वरूपाच्या सुधारणा करण्याऐवजी सर्वंकष विकास महत्त्वाचा आहे असे ते मानत. कबीर, दादू, चैतन्य महाप्रभू, नानक हे सुद्धा सुधारकच होते. पण त्यांचा भर शिकवणीवर होता. समाजाला बदलण्यावर होता. अशा महान सुधाारकांप्रमाणे सर्वत्र बदल घडवून आणणे

त्यांना महत्त्वाचे वाटे. समाजवादी आणि राजकीय विचारापेक्षा आध्यात्मिक विचार त्यांना महत्त्वाचे वाटते. आपल्या वेदांमध्ये, उपनिषदांमध्ये आश्चर्यकारक सत्त्वे आहेत. ती ग्रंथाच्या बाहेर येऊ द्या. संप्रदाय, पंथ, यातून बाहेर काढून ती देशभर पसरवा आणि जमले तर जगभर पसरवा. प्रथम सत्याचे श्रवण करा. मग मनन करा. मग ध्यास घ्या का हे मी इतरांपर्यंत नेईन, असे ते सांगत. स्वामीजींच्या मते कलियुगात एकच कर्म शिल्लक आहे ते म्हणजे दान. दानामध्ये आध्यात्मिक आणि धर्मदान सर्वोच्च असून त्यानंतर जीवनदान व शेवटचे अन्नदान आहे. वेदान्ताच्या शिकवणुकीतून गवसलेले सत्य लोकांपर्यंत पोचवणे आणि त्याद्वारे लोकांचे प्रबोधन करणे, त्यांना शिक्षित करणे म्हणजे त्यांना ज्ञानदान करणे हे सर्वोच्च कर्म आहे.

जगभर राजकीय पद्धतीतील झालेले बदल त्यांनी पाहिले आणि त्यावर चिंतन करून त्यांनी आपली योजना बनवली होती. जगभरच राजे आणि राजेशाही संपली आहे हे त्यांनी ओळखले होते. त्यांच्या मते राजे राज्य करत, कायदे करत. आता राजा राहिला नाही. सरकार स्वत: काहीच करत नाही, लोकमताचा कल बघून सरकार धोरण ठरवते. प्रभावी, दृढ असे लोकमत तयार झाल्यावर लोक स्वत:चे प्रश्न सोडवू शकतील. सामाजिक सुधारणा करू शकतील असे लोक प्रथम तयार होणे त्यांना आवश्यक वाटे. राष्ट्र क्रियाशील व्हावे, लोक सुशिक्षित व्हावेत आणि त्याच्याआधारे लोकसत्ता यावी, ही लोकसत्ता विकसित करण्यावर त्यांचा भर होता.

भारत, युरोप आणि अमेरिका पाहिल्यावर स्वामीजींनी त्यांची भारत निर्माण करण्याची योजना लोकांसमोर मांडली. सदर योजनेची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे होती.

प्राचीन महापुरुषांनी भारत घडवण्यासाठी जे काम केले त्याआधारे पुढे जाणे त्यांना अभिप्रेत होते. शंकराचार्य, रामानुजाचार्य, कबीर, दादू, नानक आदी महापुरुषांनी केलेल्या कार्यापासून प्रेरणा घ्यायची, पण तेव्हाची आणि सध्याची परिस्थिती वेगळी असल्याने काम करण्याच्या पद्धतीत आवश्यक ते बदल करण्याची लवचिकता त्यांनी दाखवली होती.

विवेकानंदांच्या मते, व्यक्तीला जसे विशिष्ट जीवनध्येय असते तसेच राष्ट्राला पण जीवनशक्ती असते. त्यांच्या मते ब्रिटन राष्ट्राची जीवनशक्ती राजकीय होती आणि भारताचे धर्म हेच राष्ट्रीय जीवनाचे केंद्र होते. आपण जो धारण करतो तो धर्म त्यांना अभिप्रेत नव्हता, तर वेदान्तात कल्पिलेल्या धर्माकडे भारताने परत जायला हवे असे त्यांचे मत होते. राष्ट्राचे जीवनध्येय असते ही त्यांची संकल्पनाच पूर्णपणे स्वतंत्र आणि अभिजात अशी आहे. टिळकांची आणि विवेकानंदांच्या बऱ्याच वेळा भेटी झाल्या होत्या. धर्म हेच केंद्र मानून राष्ट्र उभारणीसाठी शिवजयंती आणि सार्वजनिक गणेशोत्सव टिळकांनी सुरू केले होते. राष्ट्राचा धर्म हा देशातील नागरिकांच्या संवेदना व भावनांचा आधार असावा आणि वेदान्ताच्या आधारे समाजधर्माची जोपासना व्हावी असा विलक्षण विचार विवेकानंदांनी केला. रामकृष्ण मिशनमध्ये काम करणाऱ्या आपल्या सहकाऱ्यांना त्यांनी वारंवार लिहिले आहे की गरीबांमध्ये फिरा. त्यांना या राष्ट्राचा धर्म काय हे समजवाल त्याचबरोबर त्यांना व्यवहारासाठी आवश्यक भाषा इत्यादी बाबींचे पण शिक्षण द्या. दारिद्र्याचे निर्मूलन, अस्पृश्यतादी प्रथांचे निर्मूलन आणि स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान या त्रिसूत्रीला राष्ट्रउभारणीत त्यांनी कमालीचे महत्त्व दिलं आहे. गांधीजींच्या 'दरिद्रीनारायणाची सेवा' या संकल्पनेचे मूळ विवेकानंदांच्या विचारात सापडते. राष्ट्राचा केंद्रबिंदू धर्म असावा आणि शिक्षण, विज्ञान, औद्योगिकीकरण आणि अध्यात्म यांच्या संगमातून अधिष्ठित असा धर्म भारताने जोपासावा असा एक विलक्षण विचार त्यांनी मांडला. ज्या काळातील सर्व सुधारक पश्चिमेची स्तुती करून हिंदू धर्माची निंदा करत, त्या काळात, परंतु हिंदू धर्मातील वेदान्ताचे विचार महत्त्वाचे आहेत, धर्म चांगला आहे, पण वेदान्तातील धर्माला महत्त्व न देता प्रथांना महत्त्व दिल्याने भारताचा ऱ्हास झाला असे सांगत, आपल्या या सनातन ठेव्याची आठवण त्यांनी समाजाला करून दिली. हिंदू धर्मातील गतवैभवाचे स्मरण करून समाजाला हिंदू धर्माची वेगळी ओळख त्यांनी करून दिली. Renaissance म्हणजे जुन्यातील चांगल्याचे सद्य परिस्थितीतील प्रकटीकरण होय. जुन्यातील प्रथा त्याज्य आणि धर्म सोने आहे हे समाजात बिंबवण्याचे कार्य त्यांनी केले. त्याही पलीकडे जाऊन, प्रत्येक मानवात देवत्व आहे आणि त्याचे प्रकटीकरण होणे आवश्यक आहे, हा आध्यात्मिक स्तरावरील समतेचा क्रांतिकारी विचार त्यांनी मांडला.

प्रत्येक माणसातील देवत्वाचा शोध घेणारे आध्यात्मिक ज्ञान सर्वोच्च आहे. तो भारताचा शोध आहे आणि जगाला अध्यात्मिक मार्गावर नेण्यासाठी महत्त्वाचे कार्य आणि नेतृत्व भारताने करावे, त्याने जगद्‌गुरू व्हावे हे शंभर वर्षांपूर्वी पारतंत्र्यात बोलणे धारिष्ट्याचे होते. समाजाला आलेली मरगळ आणि आत्मग्लानीतून बाहेर काढून बलशाली भारताचे स्वप्न त्यांनी रंगवले.

याचबरोबर भारताने स्वतंत्र होणे आवश्यक आहे हे त्यांनी ठासून सांगितले. भारतीय स्वातंत्र्यलढ्याची प्रेरणा एका संन्यासाने देणे हे भारतातच शक्य आहे.

आध्यात्मिक दान देण्यासाठी सशस्त, श्रद्धावान असाही आणि निष्कपट माणसे हवीत. त्यांच्यात आत्मविश्वास हवा. बोलणे मृदू आणि गोड असावे आणि त्यांनी दृढनिश्चय, चिकाटी व सत्याचा मार्गावरून ढळता नये आणि मुख्य म्हणजे गुढवाद सोडा. हिमालयातील गुंफा सोडा. माणसात या. उपनिषदाचे तत्त्वज्ञान लोकांपर्यंत पोचावा हेही त्यांनी स्पष्टपणे सांगितले. आपण मानव आहोत आणि मानवता, माणुसकी आणि मानवाची सेवा हीच खरी

ईश्वरसेवा आहे असे सांगणाऱ्या चारित्र्यवान स्वयंसेवकाची, कार्यकर्त्याची देशाला गरज आहे असे विलक्षण ओजस्वी विचार विवेकानंदांनी व्यक्त केले.

१८९७ साली त्यांनी दोन राजकीय भाकिते केली. पहिले म्हणजे देशाला स्वातंत्र्य ५० वर्षांत मिळेल आणि दुसरा आपला खरा शत्रू आपला शेजारी चीन असेल. दोन्हीही भाकिते खरी झाली.

विवेकानंदांना निर्विकल्प समाधीची दीक्षा दिल्यानंतर रामकृष्ण परमहंसांनी कसे वाटते असे विचारल्यावर त्यांनी लवकरच आपण समाधी अवस्थेत जाऊ आणि मोक्षप्राप्ती लवकरच होईल असे म्हटले. त्यावर रामकृष्ण रागावले आणि त्याची निर्भर्त्सना करत म्हणाले, की तू तर स्वार्थी निघालास. स्वत:साठी समाधी, मोक्ष मिळवतोस! नरेन, माझी तुझ्याकडे तू एक विशाल वटवृक्ष होशील आणि देशाला, जगाला मार्ग दाखवशील अशी अपेक्षा होती. तू तर वैयक्तिक मोक्षासाठी निघालास. यानंतर विवेकानंद परमार्थी झाले. साऱ्या जगाचे झाले.


रामकृष्ण परमहंस एकदा असे म्हणाले, की ब्राह्मो समाजाचे नेते केशवचंद्र सेन यांच्याकडे एक मशाल आहे तर नरेनकडे अठरा मशाली आहेत. खरोखरच सर्व जगाला आपल्या ज्ञानाने, प्रेमाने जिंकून आपल्या गुरूचा विश्वास त्यांनी सार्थ ठरवला.

रवींद्रनाथ टागोर एकदा रोमन रोलाँ या प्रसिद्ध तत्त्वेत्त्याला असे म्हणाले, की भारत समजावून घ्यायचा असेल तर विवेकानंद वाचा. सकारात्मकता तुम्हाला पानोपानी दिसेल. भारताला अजून पुष्कळच मजल मारायची आहे आणि स्वामीजींचे विचार आजही आपल्याला प्रेरणा देतात कारण ते कालातीत आहेत.

**– शिरीष वीरकर**

harshadsveerkar@gmail.com



## नगरमंथन – प्रकाश पेठे




नुसते रुंद रस्ते आखून दुतर्फा वस्ती केली की नगर होत नाही. त्यात वडापिंपळाचे पार, तलाव, व्यायामशाळा, चबुतरे, घड्याळांचे टावर्स, विशाल क्रीडांगणं, हरितपट्टे, लहानमोठे बगीचे, घनदाट वृक्षांचे भूखंड अशी नानाप्रकारची लोकोपयोगी ओळखस्थाने निर्माण करावी लागतात; तेव्हा कुठे नगराला आकार येऊ लागतो. प्रत्येक नगराचा रागविस्तार करावा लागतो. मींड हरकती, मुरक्या, तिहाया, ताना-तराणे घेत गाणं बजावणं रंगवावे लागते तर ते नगर होते. नाहीतर नुसती वस्ती वाढत जाते. तेच आज आपल्या अनेक महानगरांत दिसते.

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

## तृष्णाकाठ – वैभव देशमुख




कवितेमुळे तर लहरतोय थोडासा हिरवा रंग
नाहीतर अशा उन्हाळ्यात कोण असतं कोणाच
मी झाडांनाही सावल्या चोरतांना पाहिलंय...

**मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.**

# असे होते स्वामीजी

'ग्रंथाली'च्या ठाणे केंद्राचा या वर्षीचा वाचकदिनाचा विषय काय असेल याची उत्सुकता शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या मनात नोव्हेंबरपासूनच निर्माण होते.

अविनाश बर्वेसर किंवा श्रीधर गांगलसर अजून कसे शाळेत आले नाहीत, असेही शिक्षकांना वाटून जाते.

दिवाळी सुट्टीपूर्वी आपल्याला वाचनाचा खुराक मिळणार हे सगळे हौशी सहभागी जाणून असतात आणि तो दिवस उगवतो. बर्वेसर किंवा गांगलसरांनी शाळेजवळ त्यांची धन्नो पार्क केली की उत्सुकता शिगेला पोचते आणि मग विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार पुस्तके आणि अतिशय सोप्या आणि साध्या भाषेतले वाचकदिनाचे पत्रक हाती पडते, ज्यातून चटकन अर्थबोध होतो आणि मनात कार्यक्रम आकारालाही येऊ लागतो.

अशीच या वर्षीच्याही कार्यक्रमाची पत्रिका हाती पडली आणि शिक्षक विचारमग्न झाले, 'कसे बुवा यांना एक-एक विषय सुचतात!'

या वर्षीचा विषय होता, 'असे होते स्वामीजी.' खरे तर स्वामीजी वाचून आणि ऐकून सगळ्यांनाच माहीत होते, पण त्यांच्या आयुष्यातला प्रसंग साकारायचा म्हटल्यावर नव्याने वाचन आलंच. संशोधनात्मक वाचन, अभ्यास, नाट्यी-करणासाठी लिखाण, ७वी-८वीच्या विद्यार्थ्यांमधून पात्रांची योग्य निवड हे सगळे त्यापाठोपाठ आलेच. चला! यानिमित्ताने स्वामीजींचे जीवन जवळून अभ्यासायला मिळणार!

सगळे शिक्षक वाचन, लिखाण, चिंतन यात गढून गेले. काहींना शाळेच्या वेळात तर काहींनी शाळेनंतर थांबून नाटकाच्या तालमींना सुरुवात केली. स्वामीजींची चित्रमय कथात्मक चरित्रे मिळाल्याने नाट्यीकरण करणे सोपे झाले.

१५ आणि १६ डिसेंबर २०१२ या वाचकदिनी सादरीकरणासाठी सगळे एकत्र आले. दोन्ही सरांच्या महिनाभरातील प्रत्येक शाळेतल्या ३-३ फेऱ्यांमुळे ३५ शाळांना पाचारण केले होते.

ठाण्यातल्या रामकृष्ण मठातील अवधूत महाराजांच्या आगमनाने कार्यक्रमाला शोभा आली होती. व्यासपीठावरचे भिडेसर, देशमुखसर, हितवर्धिनी सभेच्या गद्रेबाई, स्टेट बँकेचे मतेसर, बर्वेबाई, बर्वेसर, गांगलसर सगळेच मुलांचा कार्यक्रम पाहायला आणि कौतुक करायला उत्सुक होते.

अवधूत महाराजांनी स्वामीजींच्या जीवनातील गोष्ट सांगून वाचकदिनाच्या विषय निवडीबाबत कौतुक केले. विद्यार्थ्यांनाही शाबासकी दिली. मोठ्यांच्या प्रोत्साहनपर भाषणांनी उत्तम सुरुवात झाली. त्यानंतर सादरीकरणाला प्रारंभ झाला.

पहिल्या दिवशी महाराष्ट्र विद्यालय, ए.के. जोशी, शिवसमर्थ, श्रीरंग, श्रीराम प्राथमिक, श्रीराम माध्यमिक, ठा.म.न.पा. क्र. ५, थिराणी, मनीषा विद्यालय-कळवा, किसननगर म.न.पा., वर्तकनगर माध्य. विद्यालय, नौपाडा मिडल स्कूल, ठा.म.न.पा. क्र. ७-कोपरी शाळा यांनी सादरीकरण केले. यातल्या वर्तकनगर माध्य. विद्यालय, ए.के. जोशी महाराष्ट्र विद्यालय यांच्या सादरीकरणात नेटकेपणा आणि वैविध्य होते.


दुसऱ्या दिवशी १६ तारखेला बालविद्यामंदिर माजिवाडा हायस्कूल, शाहू विद्यालय, मो.ह. विद्यालय, सरस्वती सेकंडरी, बेडेकर, ठा.म.न.पा. दगडीशाळा, ज्ञानप्रसारिणी-कळवा, नाखवा हायस्कूल, न्यू कळवा इत्यादी शाळांनी सादरीकरण केले. यामध्ये शाहूमहाराज विद्यालयातल्या विद्यार्थ्यांनी रामदास स्वामी आणि स्वामीजी यांच्यातील साम्यस्थळ दाखवून वाहवा मिळवली. तर दगडीशाळेतल्या ठा.म.न.पा. विद्यालयाने स्वामीजींच्या जीवनातले ५ प्रसंग उत्कृष्ट पद्धतीने सादर केले. याबद्दल शाहू विद्यालयाचे काशिदसर आणि दगडी-शाळेच्या रिंगेबाई यांचा पुस्तक-पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

अशा तऱ्हेने २८ शाळांच्या सहभागातून स्वामीजींचे अल्पचरित्र मुलांच्या मनात ठसले. विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्यात या चरित्राचा ठसा उमटल्याशिवाय राहणार नाही, याची रसिक श्रोत्यांना खात्री पटली.

**- रमा रवींद्र नेने**
१५०३, अमृत पॅराडाइज,
मनीषानगर गेट नं. २, कळवा,
ठाणे ४००६०५
दूरध्वनी - २५४१३८९८
भ्रमणध्वनी - ९९६९८८६५००

# शाळा-कॉलेज-वाचनालयांसाठी खास सवलतीत मूळ ७०७५ रुपयांचे चार एकत्रित संच टपालखर्चासह ५००० रुपयांत

## डॉ. नरेंद्र जाधव यांनी अनुवादित व संपादित केलेल्या ‘बोल महामानवाचे’ आणि ‘रवींद्रनाथ टागोर जीवनदर्शन या संग्राह्य ग्रंथत्रिवेणी







‘बोल महामानवाचे’ – जनआवृत्ती संच
मूळ किंमत १२०० रु. सवलतीत ८०० रुपयांत
अधिक टपाल खर्च १५० रु.

‘रवींद्रनाथ टागोर’ – डिलक्स आवृत्ती संच
मूळ किंमत १७०० रु. सवलतीत १२०० रुपयांत
अधिक टपाल खर्च १०० रु.

## बबन लोंढे आणि सुधाकर गायकवाड यांनी संपादित केलेली तीन महत्त्वपूर्ण प्रकाशने

**‘अस्मितादर्श’ मधील**
**निवडक वैचारिक लेख, कथा, कविता**




संच – मूळ किंमत ९७५ रु. सवलतीत ६८० रुपयांत
अधिक टपाल खर्च १०० रु.

## इंग्रजी थिसॉरसच्या धर्तीवर मराठीत प्रथमच
## सुरेश वाघे लिखित ‘संकल्पनाकोश’चे पाच खंड




संचाची मूळ किंमत ३२०० रु.
सवलतीत २४०० रुपयांत
अधिक टपाल खर्च २०० रु.

॥ग्रंथाली॥ द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग, माटुंगा (प.), मुंबई-४०००१६ • दूरध्वनी : २४३०६६२४/२४२१६०५० • granthali02@gmail.com

RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011




'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली'करता इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०० ०३१ येथे छापून ग्रंथाली, द्वारा वुलन मिल म्युनि. स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग, माटुंगा (प.), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.